शनिवार, २२ जुलै २०२३

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०२ अंक -३०५

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक


●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SATURDAY 22 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-305 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5


## इर्शाळवाडीच्या घटनेने सप्तशृंगी गडावरील नागरिक भयभीत

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** इर्शाळवाडीच्या घटनेनंतर सप्तश्रृंगी गडावरील पहिल्या पायरीनजीकच्या धोकादायक भागाचा तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामपंचायतीने मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

समुद्रसपाटी पासून १४८० मीटर उंचीवर असलेल्या सप्तश्रृंगी गड हा साडेतीन पीठांपैकी एक असून येथे नियमित १५ ते २० हजार तर वर्षभरात ५० ते ६० लाख भाविक भेट देत असतात. गडावर चार ते पाच हजार स्थानिक लोकसंख्या आहे. सप्तश्रृंगी मातेचे मंदिर हे डोंगरकपारीला असून मंदिर परिसरातील पायऱ्यांवरील रामटप्पा, कासवटप्पा व रोपवे मार्गाच्या परिसरातील काही भाग ठिसूळ झाला आहे. या भागाच्या खाली दुकाने व नागरी वस्ती आहे. त्यामुळे हा ठिसूळ भाग कोसळला तर नागरी वस्तीला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी वनविभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. सप्तश्रृंगी गडावरमाळीण, इर्शाळवाडीसारखी दुर्घटना होण्याची भीती स्थानिक ग्रामपंचायतीने व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवरसप्तशृंगी गडग्रामपंचायतीने मुख्यमंत्र्यांना पत्र दिले आहे. काही वर्षांपूर्वी घडलेल्या माळीण दुर्घटनेनंतर सप्तशृंगी गडाचा मुद्दा उपस्थित झाला होता, त्यावेळी देखील स्थानिक ग्रामपंचायतीने पत्र दिले होते. काही महिन्यापूर्वी सरकारकडून आधुनिक पद्धतीने संरक्षित जाळी ( गर्डर ) बसवण्यात अली आहे. मात्र ती कुचकामी आहे. त्यामुळे इर्शाळवाडीच्या घटनेनंतर पुन्हा एकदा सप्तशृंगी गड चर्चेत आला आहे. गडावरील पायऱ्यांच्या दोन्ही बाजूला दगडी संरक्षक भिंत उभारण्याची मागणी पत्राद्वारे करण्यात आली आहे.








# नांदेड जिल्ह्यात अतिवृष्टी

## दोघांचा मृत्यू : मुखेड तालुक्यातील तारदरवाडी येथील तलाव फुटला

आधुनिक केसरी न्यूज


**नांदेड : गेल्या दोन दिवसांपासून सुरु असलेल्या जोरदार पावसामुळे नांदेड जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झाले आहे. गुरुवारी रात्री मुखेड, बिलोली, धर्माबाद, देगलुर, उमरी, अर्धापूर तालुक्यात अतिवृष्टी झाली. त्यामुळे नद्या नाल्यांना पुर आले आहे. तर काही गावात पाणी शिरले आहे. जिल्हा प्रशासन अशा सर्व परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, गरज असलेल्या ठिकाणी बचाव पथकाच्या मदतीने मदत केली जात आहे.**

दरम्यान माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्याकडून देखील नांदेड जिल्ह्यातील पावसाचा आढावा घेतला जात आहे. तर नांदेड जिल्ह्यातील उमरी, अर्धापूर येथील नागरिक तुंबलेल्या पाण्याचे, पुराचे व्हिडीओ पाठवत असल्याची माहिती अशोक चव्हाण यांनी ट्वीट करून दिली आहे. नांदेड जिल्ह्यात रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. गेल्या 12 तासांत 230 मीलीमिटर पावसाची नोंद झाली आहे. तर जिल्ह्यातील सहा तालुक्यात अतिवृष्टी झाल्याची नोंद करण्यात आली आहे. अनेक नदी नाल्यांना पूर आला आहे. काही गावात मोठ्याप्रमाणात पाणी साचून नुकसान झाल्याचे चित्र आहे. पाणी साचलेल्या गावात स्वतः जिल्हाधिकाऱ्यांनी भेट दिली आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग सज्ज असून, प्रशासनाकडून मदतकार्य केले जाते आहे. पूर आलेल्या गावातील लोकांना सुरक्षीतस्थळी हलवण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी दिली आहे. मुखेड तालुक्यातील तारदरवाडी येथील तलाव फुटला असून, त्यामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे.

**दोघे पाण्यात बुडाले :** अर्धापूर तालुक्यातील पिंपळगाव महादेव परिसरात असलेल्या आसना नदी पात्रात पोहण्यासाठी गेलेल्या दोघांना आपला जीव गमवावा लागला आहे . पाण्याचा अंदाज न आल्याने या दोघांचा बुडून मृत्यू झाला आहे . राहुल रमेश आठवले आणि साई दशरथ चुनुरवार असे पाण्यात बुडालेल्या तरुणांची नावे आहेत .








विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# स्वदेशीची जादू

आधुनिक केसरी

छोट्या मोठ्या आजारांसाठी आयुर्वेदातील उपचारांचा वापर करून अगदी आवश्यक तेव्हा अलोपॅथी उपचार पद्धती वापरता येईल. आयुर्वेद हा सुमारे सहा हजार वर्षांपूर्वीचा प्राचीन असल्याचे पुरावे आहेत. त्यातील संशोधकांनी आपले आयुष्य त्यासाठी खर्ची घातले आहे. आयुर्वेदातील उपचारात रोग पूर्णपणे बरा करण्याची क्षमता असून त्या औषधांचे दुष्परिणाम अलोपथी औषधांच्या तुलनेत अतिशय कमी आहेत. आपल्याला होणाऱ्या आजारातील सुमारे ऐंशी टक्के आजार हे मनोकायिक ( सायकोसोमॅटीक ) असतात असे संशोधन सांगते. म्हणजेच हे आजार संसर्गजन्य नसतात. योग आणि आयुर्वेद शरीर आणि मन या दोहोंचा विचार करून आपल्याला आरोग्यदायी जीवन जगण्याचा मार्ग दाखवतात. योग, आसन आणि प्राणायाम यांचे महत्व आज जगाने मान्य केले आहे. 21 जून हा दिवस तर जवळपास संपूर्ण जगात योग दिन म्हणून साजरा केला जातो. योगाचा अभ्यास जगातील अनेक देशात आज केला जातो आहे. आयुर्वेद आणि योग यांच्यात आपल्याला निरामय आरोग्य देण्यापासून ते मोक्षापर्यंत पोहोचवण्याचे अद्भुत सामर्थ्य आहे. योगासने, प्राणायाम, ध्यान आदींच्या साहाय्याने अनेक असाध्य आजारांवर मात करता येते याचा अनुभव आज जगभरातील अनेक लोक घेत आहेत. आजच्या धकाधकीच्या आणि दैनंदिन तणावपूर्ण वातावरणात योग, आसने आणि प्राणायाम अनेक लोकांना आनंदी आणि आरोग्यपूर्ण जीवन जगण्यासाठी मदत करत आहेत. रामदेव बाबांसारख्या अनेक योगाचार्यांनी जगभर योगाच्या प्रसारासाठी मोठा हातभार लावला आहे. आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी सुद्धा नियमितपणे योगासने आणि प्राणायाम करतात. रॉबर्ट स्वोबोदा हा अमेरिकेतील ओक्लाहोमा विद्यापीठात वैद्यकीय शिक्षण घेणारा एक तरुण. एकदा काही कारणाने तो आफ्रिकेत गेला. तिथे त्याला अतिसाराची लागण झाली. तेथील एका आदिवासी व्यक्तीने त्याला कसला तरी झाडपाला खायला दिला. त्याचा आजार आश्चर्यकारकरित्या बरा झाला. आपले ओक्लाहोमा विद्यापीठातील वैद्यकीय शिक्षण सोडून आपण शास्त्रशुद्ध असे आयुर्वेदाचे शिक्षण घेतले पाहिजे असे त्याच्या मनाने घेतले. त्यासाठी भारताइतका चांगला देश दुसरा नाही असे त्याला वाटले. आयुर्वेदाच्या ओढीने तो भारतात आला. पुण्याच्या टिळक आयुर्वेद महाविद्यालयातून आयुर्वेदाची पदवी घेतली. रॉबर्ट स्वोबोदा यांनी मग आयुर्वेदाबरोबरच योगशास्त्र, ज्योतिषशास्त्र, तंत्रविद्या इ. अनेक गोष्टींचा अभ्यास केला. आज ते जगभर आयुर्वेदाचा प्रसार आणि प्रचार करीत आहेत. त्यासाठी त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली आहेत. 'लाईट ऑन लाईफ' हे त्यांचे पुस्तक त्यापैकीच एक. आरोग्यपूर्ण जीवनासाठी दररोजचा शुद्ध आणि ताजा आहार, योगात सांगितलेल्या अष्टांग मार्गाचे आचरण या गोष्टी आपल्याला निरामय आणि आनंदी जीवनाकडे घेऊन जातात. ( क्रमशः )





## आनंदी पहाट

# जुने ते सोने, हे विचारांचे वैभव

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

एकीकडे जुनं ते सोनं म्हणणारी व्यक्ती काहीवेळा नंतर नवं ते हवं असंही म्हणायला सुरुवात करते. अनेक जुन्या आठवणी, वातावरण, ठिकाण, विचार, जुने कपडे अशा अनेक जुन्या गोष्टींचा कालांतरानं आपल्याला तिटकारा यायला लागतो, त्या नकोशा वाटायला लागतात. काहीतरी नवं हवं, असं वाटायला लागतं. नव्यामध्ये नाविन्य सामावलेलं असतं, ह्याची जाणीव झाली कि मग जुनं नकोसं होऊ लागतं. एका दृष्टीनं ते चांगलंच असतं. आपल्या वैचारिक चौकटीला भेदून, तिला छेद देऊन आपण नवविचारांचा अंगीकार त्यायोगे करायला सुरुवात करतो. हा बदल अनेकदा योग्यच ठरतो. नाविन्यपूर्ण अनुभूतीची आपल्या अंतर्मनाला अधिक जरुरी असते. कोणत्याही नवीन गोष्टीचा स्वीकार करताना आपण अधिक उत्साही, आनंदी असतो. अनेकदा आपल्याला जुनं सोडायचं नसतं आणि नवं स्वीकारायला मन तयार नसतं. एका क्षणांत दृष्टीकोन बदलणं हे साधसुधं स्थित्यंतर नसतं. जगातील सर्वांत अवघड बाब म्हणजे विचार बदलणं. इतर गोष्टी केव्हाही बदलता येतात. आज आवडलेली गोष्ट उद्या फेकून देता येते. पण नवा विचार स्वीकारणे ही खूप मोठी बाब असते, खूप मोठी घटना असते. जर विचार बदलला, तर तो क्षण सण साजरा करण्यासारखाच असतो. निसर्ग आपल्या जीवनामध्ये रोज बदल घडवत असतो. पण हाच बदल आपण सहजासहजी स्वीकारत नाही. आपण कालच्या दिवसामध्येच गुरफटलेले असतो, त्यालाच कवटाळत बसलेले असतो. वर्तमानातही आपला भूतकाळ आपण घट्ट धरून बसलेले असतो. आपण भूतकाळातील अनुभव विसरायचं ठरवलं तरीही विसरू शकत नाही. त्यांवरच जीवापाड प्रेम करत रहात असतो. कालांतरानं निराशेच्या कचाट्यात सापडतो आणि आनंदाला मुकतो.




आधुनिक केसरी

## अद्वैतात न्हालो | दिंडीमध्ये ||

कैवल्याचे रूप | पाहिले म्या आता ||
पाऊली खेळता | दिंडीमध्ये ||१||
सुखाचा सोहळा | भक्तीचा सागर ||
चैतन्याचा पूर | दिंडीमध्ये ||२||
मनाच्या गाभारी | नामाचे गुंजन ||
लोकांती चिंतन | दिंडीमध्ये ||३||
देह आत्मा एक | माऊलीच झाली ||
विकाराची होळी | दिंडीमध्ये ||४||
होऊनी निस्संग | वारीत नाचलो ||
अद्वैतात न्हालो | दिंडीमध्ये ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

अमृतांशुस्वसारं त्वां पापापहारिणीं शुभाम् | दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ४९ || चंद्राची बहिण असणाऱ्या, पाप हरण करणाऱ्या अशा तुला शुभेला दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी दुर्गा देवीला नमन करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

अनूमान उपमान है, अवर शब्द परमान ।
वन प्रत्यक्ष क्रम सृष्टि का, पाँच परिक्षा ज्ञान ।।१६।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल अष्टम अध्याय) ०२/०८/१६

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :

प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द आणि सृष्टीक्रम या पाच परीक्षा आहेत. यांद्वारे सर्व पदार्थांची परीक्षा करून बोध प्राप्त केला पाहिजे. ज्ञानेंद्रियां द्वारे जे भ्रमरहित ज्ञान होते, त्यास प्रत्यक्ष म्हणतात. प्रत्यक्ष साधनां द्वारे अप्रत्यक्ष पदार्थांची जी सिद्धी केली जाते त्यास अनुमान म्हणतात, जसे धूरा वरून अग्निचे, कार्यावरून कारणाचे, गुणा वरून गुणीचे, पुत्रा वरून पित्याचे अनुमान होते. सादृश्य तुल्य वस्तूंची उपमा देऊन कुठल्याही पदार्थांची जी सिद्धी केली जाते, त्यास उपमान म्हणतात, जसे सूर्या समान प्रकाश, चंद्रा समान मुख, याला उपमान म्हणतात. सद्गुरूंच्या "आप्त वचनास" शब्द म्हणतात. माता-पित्या द्वारे संतान होते. यास सृष्टी क्रम म्हणतात. प्रकृतीच्या नियम, व्यवस्थे नुसार असलेल्या व्यवहारास सृष्टी क्रम म्हणतात. या पाच परीक्षा आहेत, ज्यांच्या द्वारे सर्व वस्तू परीक्षा करून जाणल्या जातात आणि मान्य होतात.

................................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# दुश्चीतनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


आळस व अतिनिद्रा आळसाने नित्यनेम चालत नाही. अभ्यास होत नाही. कोणत्याही गोष्टींचा धीर धरण्याची सवय लागत नाही स्वभाव चंचल होतो. मनोवृत्ति मलिन होते. विवेकाची गति मंदावते. माणूस आळशी बनला की त्याला भरपूर निद्रा घ्यायची सवय लागते. भरपूर जेवावे, भरपूर झोपावे आणि उरलेल्या वेळात उगाच सटरफटर कामात वेळ घालवावा. आळसाने झोप घेण्याची सवय वाढते. वासनांचा विस्तार वाढतो.निश्चय करण्याची सद्बुद्धि नाहिशी होते.

म्हणून तर म्हणतात ना, "सारे काही प्रमाणात असावे कोणत्याही गोष्टींचा अतिरेक करू नये.

# नाम हे परमात्मस्वरूप आहे

आधुनिक केसरी

नाम म्हणजे भगवंताचे नांव. साधन या दृष्टीने देवाच्या निरनिराळया नांवांत फरक नाही. नाम हा जीव आणि शिव यांच्यामधला दुवा आहे. नाम हे साधनही आहे आणि साध्यही आहे. नाम सगुण आहे आणि निर्गुणही आहे. नामाचा आरंभ सगुणात आहे तर शेवट निर्गुणात आहे. आरंभ सगुणात आहे असे म्हणण्याचे कारण हे की भगवंत मुळात जो निर्गुण निराकार आहे तो जेव्हा सगुणात आला तेव्हाच त्याला नामरूप लागले आणि सगुणरूप नाहीसे झाले तरी नाम शिल्लकच राहिले म्हणून ते निर्गुणही आहे. तेव्हा सगुण आणि निर्गुण भक्तीला आधार नामाचाच आहे. नाम हा सत्संगाचा पाया आहे आणि कळसही आहे. नाम म्हणजे आपली वृत्ती आणि भगवंत यांना जोडणारी साखळीच आहे. लग्न झाल्यावर स्त्री जशी नवऱ्याशी एकरूप होऊन जाते त्याप्रमाणे वृत्तिचे नामाशी लग्न होऊन ती नामरूप बनली पाहिजे. नाम हे अत्यंत सूक्ष्म आहे आणि वृत्तिसुध्दा सूक्ष्म आहे म्हणून नाम घेण्याने वृत्ती सुधारेल, वृत्ती सुधारली की चित्त शांत होईल, चित्त शांत झाले की निष्ठा उत्पन्न होईल. सगळयांचा भावार्थ एकच आहे. अन्नाला स्वतःची चव असते त्यात आपणच आपली गोडी आणि आवड घालून नंतर ते खातो. पण नामाला स्वतःची अशी चव नाही. त्यात आपणच आपली गोडी आणि आवड घालून ते घेतले पाहिजे. आपण जितकी जास्त गोडी त्यात घालू तितके ते अधिक गोड वाटेल. पंढरपूरला जायला पुष्कळ रस्ते आहेत परंतु सर्वांना शेवटी बारीतून जाऊनच दर्शन घ्यावे लागते त्याप्रमाणे इतर साधने जरी केली तरी नामसाधन केल्यावरच आत्मस्वरूपाची प्राप्ती होते. आपण नाम घ्यावे ते आपणच आपल्या कानांनी ऐकावे आणि ते घेता घेता शेवटी स्वतःला विसरून जावे हाच नामसाधनेतला आनंदाचा मार्ग आहे. जसे आपले आपलेपण आपल्या नांवात आहे तसे देवाचे देवपण त्याच्या नामात आहे. आपण आज जे नाम घेतो तेच नाम शेवटपर्यंत कायम राहते परंतु देहबुध्दी जसजशी कमी होत जाईल तसतसे नाम अधिकाधिक व्यापक आणि अर्थगर्भ बनत जाते आणि शेवटी नाम हे परमात्मस्वरूपच आहे असा अनुभव येतो. पाणी हे जसे शरीराचे जीवन आहे तसे नाम हे मनाचे जीवन बनले पाहिजे. नाम इतके खोल गेले पाहिजे की प्राणाबरोबर ते बाहेर पडावे. अंतकाळी अगदी शेवटी सुटणारी वस्तू म्हणजे भगवंताचे नाम पाहिजे. नामातच शेवटचा श्वास गेला पाहिजे. १. नामात एका आनंदाशिवाय दुसरे काही नाही. ।। सद्गुरुनाथ महाराज की जय ।।



# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

प्रत्येक शरीराचे काही विशिष्ठ कंपने असतात व त्या नुसार त्या शरीरावर ह्या श्रुष्टीतील बऱ्या वाईट गोष्टी अवलंबून असतात त्यानुसारच स्वभाव,आवडीनिवडी ,अवलंबून असते. हे शास्त्र फक्त सद्गुरूंनाच कळत असल्याने त्याला अनुरूप असेच नाम /मंत्र ते देत असतात किंवा सदगुरु जे काही सांगतात ते आपल्या शरीराच्या कंपनाशी सुसंगत असल्यानेच त्यांच्या आज्ञा पाळणाऱ्यावर लगेच अपेक्षित परिणाम होण्यास सुरवात होत असते आणि या प्रवाहात आल्या नंतर खरे तर तेच सर्व करून घेत असतात.. संतांच्या कृपेने दुखणे बरे झाले म्हणून त्याला मानणे हे खरे नव्हे. जो शिष्याला विषयात ओढील त्याला गुरू कसे म्हणावे ? जो काही चमत्कार करून दाखवील त्याला आम्ही बुवा म्हणतो. संताची परिक्षा आम्ही बाह्यांगावरून करतो. सर्वांभूती भगवंत ज्याला पाहता येईल त्याला संताची खरी ओळख होईल. क्रमशः

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

परोपदेशे पाण्डित्यं सर्वेषां सुकरं नृणाम् ।
धर्मे स्वीयमनुष्ठानं कस्यचित्तु महात्मनः ॥

सरलार्थ – सर्व माणसांना दुसऱ्या माणसाला उपदेश करणे सोपे असते. (पण ) स्वतः धर्माचे आचरण करणे ही गोष्ट कोण्या महात्म्याच्याच बाबतीत दिसून येते.

स्पष्टीकरण - प्रत्येक मनुष्याला 'तू असे कर, तू तसा वाग' असा दुसऱ्याला उपदेश करणे सोपे असते. त्यात स्वतःला कसलीच तोशीस लागत नाही. पण उपदेश करतोस, पण तू स्वतः तसा वागतोस का ?' असे एखाद्याने विचारले तर ? तिथे वाचा मुकी होते. कारण धर्माचे, नीतीचे आचरण कठीण असते. सामान्य माणसांची त्याकडे प्रवृत्ती वळत नाही. असा एखादाच पुरुष, की जो दुसऱ्याला उपदेश करतो, त्याप्रमाणे स्वतः वागतो.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे



सशस्त्र क्रांतिचा महामेरु
चंद्रशेखर आझाद
पान ६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, २२ जुलै २०२३




पत्र निर्भयाचे !
पान ७





# मणिपूर महिला अत्याचाराच्या मुद्द्यावर विधानसभेत काँग्रेस पक्ष आक्रमक

## अमानवी सरकार बरखास्त करुन राष्ट्रपती राजवट लागू करा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मणिपूरमध्ये महिला अत्याचाराच्या अत्यंत घृणास्पद घटना उघड झाल्या असून या घटना मानवतेला काळीमा फासणाऱ्या आहेत. केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने या घटनांकडे बघ्याची भूमिका घेतली असून अशा निष्क्रिय केंद्र सरकारच्या विरोधात निषेधाचा ठराव सभागृहात मांडला जावा आणि मणिपूर घटनेवर चर्चा घडून आणली जावी अशी काँग्रेससह विरोधी पक्षाच्या सदस्यांनी विधानसभा अध्यक्षांकडे चर्चा मागितली होती. विधानसभा अध्यक्षांनी चर्चा नाकारल्याने काँग्रेसह विरोधी सदस्यांनी सभात्याग केला.

मणिपूरची घटना माणुसकीला काळीमा फासणारी असून देशभरातून या घटनेचा धिक्कार करण्यात येत आहे. या घटनेवर विधानसभेत ठराव करुन पीडित महिलांना न्याय मिळाला पाहिजे व सरकारचा धिक्कार झाला पाहिजे अशी विरोधकांची मागणी होती. काँग्रेस पक्षाच्या महिला सदस्यांनी चर्चा घेण्याची मागणी लावून धरली परंतु विधानसभा अध्यक्षांनी बोलण्याची संधी दिली नाही. अध्यक्षांनी म्हणणेच ऐकून घेतले नाही त्यामुळे सरकारचा निषेध करुन सभात्याग केला, अशी माहिती माजी मंत्री वर्षा गायकवाड यांनी दिली. मणिपूरमधील महिला अत्याचाराच्या घटनेवर केंद्र व मणिपूरमधील भाजपा सरकारचा धिक्कार करत विधानसभेच्या पायऱ्यांवर सकाळी काँग्रेससह विरोधी पक्षांनी आंदोलन केले. यावेळी भाजपा सरकारचा निषेध करण्यात आला व केंद्र व मणिपूर सरकारविरोधात घोषणा देण्यात आल्या.

मणिपूरच्या घटनेचा निषेध करत मणिपूरचे अमानवी सरकार बरखास्त करुन राष्ट्रपती राजवट लागू करावी, असा ठराव काँग्रेस विधिमंडळ पक्षाने केला.

# वीज कोसळून वीस जण जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** जिल्ह्यात गेल्या ३ दिवसांपासून विविध भागात नदी, नाले दुथडी भरून वाहत असून पावसाची संततधार सुरू आहे. अशातच आज पवनी तालुक्यातील चीचाळ गावात शेतात भातलावणी सुरु असताना वीज कोसळून १६ महिला आणि ४ पुरुष असे एकूण २० जण जखमी झाल्याची घटना समोर आली आहे.

जखमी झालेल्या आहेत. या सर्व महिलांवर अड्याळ ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या सर्व शेतमजूर महिला असल्याची प्राथमिक माहिती कळते आहे.मागील दोन दिवसांपासून राज्यात पावसाने हाहाकार माजवला आहे. त्यामुळे राज्यात अनेका ठिकाणी दुर्दैवी घटना समोर येत आहेत. भंडारा जिल्ह्यातही दोन विज पडल्याच्या घटना समोर आल्या असून यामध्ये २० जण गंभीर जखमी झाले आहेत.जिल्हा प्रशासनाकडून जिल्ह्यात येलो अलर्ट देण्यात आला आहे. पाऊस सुरु झाल्याने सध्या शेतीचे हंगाम सुरू आहे. अशातच विज पडल्याच्या दोन दुर्दैवी घटना समोर आल्या आहे.काल सायंकाळच्या सुमारास शेतावर काम करत असताना साकोली व पवनी तालुक्यात वीज कोसळण्याच्या घटना घडल्या. यामध्ये साकोली येथे दोन मजूर जखमी झाले असून त्यांचे उपचार साकोली येथील ग्रामीण रुग्णालयात सुरू आहे.

तर दुसरी घटना पवनी तालुक्यातील चिचाळ येथे घडली असून शेतात रोवणी करत असताना अचानक वीज पडली. यामध्ये २० महिला जखमी झाल्या आहेत. या महिला बचावल्याने मोठा अनर्थ टळला. या दुर्घटनेतील जखमी महिलांवर जवळच्या अड्याळ ग्रामीण रुग्णालयात दाखल केलं असून डॉक्टरांची टीम त्यांच्यावर उपचार करते आहे. सध्या मिळत असलेल्या माहितीनुसार सर्व महिलांची प्रकृती धोक्याबाहेर आहे. छाया रुपचंद बिलवणे वय ३४ वर्षे रा. चिचाळ , कविता विनोद मोहरकर वय ३२, अनिल आनंदराव काटेखाये, वय ४२ रुपचंद विठ्ठल बिलवणे , वय २५ विजय भाकर मोहकर ५० वर्षे रुखमा रामचंद्र विलवणे वय ५५ वर्षे ,संगिता विनोद नखाते वय ३५ वर्षे, देवचंद बालकण बिलवणे वय ४० वर्षे, ज्ञानेश्वर गोपिनाथ बिलवणे वय ५५ वर्षे, प्रमिला अमिल काटेखाये वय ३२ वर्षे, दिपमाला झालेश्वर सिलवणे वय – ४५ वर्षे , शालु केशव भुरे वय -४८ वर्षे , लालचंद बिलवणे वय २८ वर्षे, रज्जु लुकाराम मोहरकर वय ३०, सुष्मा परमेश्वर बिलवणे वय ३८ वर्ष, सुनिता राजीव मोहरकर वय-३० वर्षे, सुनिता देवचंद बिलवणे वय – ३८ वर्षे, जोत्सना विजय मोहरकर वय ३०, प्रियंका विकास बिलवणे वय – ३५ वर्षे, राणी कैलास काटेखाये वय ३१ वर्षे , विक्की योगीराज बिलवणे वय २६ असे जखमींची नावे आहेत.

# भर पावसात आ. जोरगेवार ऑन द स्पॉट

## कारणे शोधून उपाययोजना करण्याच्या केल्या सूचना

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** भरपावसात शुक्रवारी आ. किशोर जोरगेवार यांनी पावसाच्या पाण्यामुळे नुकसान झालेल्या भागांची अधिकाऱ्यांसह पाहणी केली आहे. यावेळी येथील नागरिकांना शासकीय मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरु आहे. प्रशासन कामाला लागले आहे. नागरिकांनीही सहकार्य करावे. अधिकाऱ्यांनीही नुकसाणग्रस्त भागांचे प्राथमीकतेने पंचनामे करुन अहवाल सादर करावा, अशा सूचना यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना केल्या. यावेळी मनपा आयुक्त विपिन पालिवाल, शहर अभियंता महेश बारई, तहसीलदार विजय पवार, सहायक आयुक्त सचिन माकोडे, सिएटीपीएसचे अभियंता रामटेके, मनपाचे स्वच्छता निरिक्षक अमोल शेळके आदींची उपस्थिती होती.

मंगळवारी झालेल्या मुसळधार पावसामूळे बाबूपेठ, आंबेडकर नगर, सिस्टर कॉलनी, जलनगर, रय्यतवारी कॉलरी, महाकाली कॉलरी, नानाजी नगर वडगाव, राष्ट्रवादी नगर, तुलसी नगर, वृंदावन नगर, इंडस्ट्रियल वार्ड, नेहरुनगर, उत्तमनगर, सरकारनगर या भागातील नागरीवस्तीमध्ये पाणी शिरले. त्यामुळे नागरिकांचे मोठे नूकसाण झाले आहे. दरम्यान आ. किशोर जोरगेवार यांच्या वतीने परिस्थितीचा आढावा घेतल्या जात आहे. आमदार किशोर जोरगेवार यांनी सदर विषय अधिवेशनात मांडल्या नंतर नुकसाणीचे पंचनामे सुरु करण्यात आले आहे. आ. जोरगेवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेत अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचनाही केल्या आहेत.

शासनाकडून मिळणारी मदत लवकर मिळावी यासाठी प्रयत्न सुरु आहेत. बेघर झालेल्या नागरिकांना मदत केंद्रात ठेवण्याचीही व्यवस्था करण्यात आली असल्याचे यावेळी आ.जोरगेवार म्हणाले. यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी उपस्थित अधिका-यांना या भागात पाणी साचण्यामागचे कारण शोधुन यावर उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या आहे. अधिकाऱ्यांनीही या भागातील नाल्यांची पाहणी केली असून नाले खोलीकरणासाठी प्रस्ताव तयार करणार असल्याचे म्हटले आहे. यावेळी सिएसटीपीएस, मनपा प्रशासण आणि अधिकाऱ्यांनी संयुक्त बैठक घेत राष्ट्रवादी नगरमधून जात असलेल्या नाल्याच्या बंदोबस्तासाठी तत्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. यावेळी यंग चांदा ब्रिगेडच्या महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, बंगाली समाज महिला शहर प्रमूख सविता दंडारे, सायली येरणे, युवती प्रमुख भाग्यश्री हांडे, कविता निखारे, निलिमा वनकर, आशा देशमुख, प्रेमीला बावणे, शांता धांडे, शहर संघटक विश्वजीत शाहा, युवा नेते अमोल शेंडे, शिक्षक आघाडी प्रमूख प्रतिक शिवणकर, करणसिंग बैस, विलास सोमलवार, ॲड. राम मेंडे, हरमन जोसेफ, ॲड. परमहंस यादव, नकुल वासमवार, कार्तिक बोरेवार, बादल हजारे आदींची उपस्थिती होती.




## भय इथले संपत नाही

आधुनिक केसरी

रायगड जिल्ह्यातील खालापूर येथील इर्शाळवाडीवर काल १९ जुलै रोजी भीषण दरड कोसळली. यापूर्वी महाराष्ट्रात अशा अनेक घटना घडलेल्या आहेत. इर्शाळवाडीतील दुर्घटनेत २० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येते. बचावकार्यात अनेक अडचणी येत असतानाही दुसऱ्यादिवशी बचावकार्य सुरू आहे. रस्ता अरुंद असल्याने तिथे कोणत्याही प्रकारचे वाहन जाऊ शकत नसल्याने अडचणी निर्माण होत आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत निवदेन दिले आहे. यावेळी त्यांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करणार असल्याची घोषणा आज त्यांनी पुन्हा केली. इर्शाळवाडीवरील प्रसंग दुर्दैवी होता. आपल्याकडे सर्व यंत्रणा असताना आपण वापरू शकलो नाही ही मनामध्ये खंत आहे. आज पुन्हा बचावकार्य सुरू आहे. पहिल्या, दुसऱ्या दिवशीही माणसे जिवंत निघाल्याची अनेक उदाहरणे इतर दुर्घटनेत आपण पाहिली आहेत, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. म्हजणेच, ढिगाऱ्याखाली अडकलेली माणसे सुखरूप असतील अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली. ते म्हणाले, एनडीआरएफ टीमचे काम वाखणण्याजोगे आहे. जीव ओतून, जीव धोक्यात घालून त्यांना काम करताना पाहिलेले आहे. ज्या ज्या लोकांना याविषयी माहिती मिळाली ते सर्व तिथे उपस्थित होते. दुर्घटनाग्रस्त लोकांची व्यवस्था आपण तातडीने केली आहे. ३० कंटेनर आले आहेत. यामध्ये ४७ कुटुंबाची व्यवस्था करण्यात आली आहे. टॉयलेट, बाथरूमची सोय केली आहे कायमस्वरुपी पुर्नवसन होत नाही तोवर त्यांच्या तात्पुरत्या निवारण्याची सोय करण्यात आली आहे. कायमस्वरुपी पुनर्वसनासाठी जिल्हाधिकाऱ्यांशी बोललो आहे. तातडीने पुनर्वसन झाले पाहिजे. पुनर्वसनासाठी सिडकोला आदेश देण्यात आले आहेत. त्यांना जागा दिल्या दिल्या त्यांनी कायमस्वरुपी घरे बांधून देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे, अशी माहिती एकनाथ शिंदे यांनी आज सभागृहात दिली. अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्याकरता दरडप्रवण क्षेत्रातील लोकांचे स्थलांतर करण्याबाबत आज कॅबिनेटमध्ये निर्णय घेण्यात आला आहे. या नागरिकांचे स्थलांतर करण्याचा सरकारी यंत्रणा, पोलीस, जिल्हाधिकाऱ्यांचा प्रयत्न असतो. परंतु काही लोक आग्रहाने तिथेच राहतात. परंतु तेथील लोकांना सुरक्षितस्थळी हलवण्याचा निर्णय घेतला आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले. धोकादायक परिस्थितीत राहणाऱ्या लोकांना कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याचा प्रयत्न आहे. राज्यभरामध्ये अशाप्रकारचे जे दरडप्रवण क्षेत्रातील नागरिकांना तिथून सुरक्षित स्थळी हलवण्यात येणार आहे. पावसामध्ये दरड कोसळून दुर्घटना होऊ नये, जीवितहानी होऊ नये याककरता काळजी घेत आहोत. त्याप्रकराचा निर्णय घेतलेला आहे, असेही शिंदे म्हणाले.

## राजकीय महानायक !



वसंत मुंडे
प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई.

आधुनिक केसरी

**विधानसभा निवडणुकीत युतीला स्पष्ट बहुमत मिळाले असताना मित्र पक्षाने दगा दिला. राजकीय परिस्थिती कोणत्याच बाजुंनी अनुकूल राहिली नाही. अशावेळी कोणीही खचून जाणे स्वाभाविक, पण तसे घडले नाही. भाजपचे देवेंद्र फडणवीस जोमाने उभे राहिले. एकशे पाच आमदार घेऊन विरोधी बाकावरुन विरोधी पक्षनेता कसा असतो? हे दाखवून दिले. सत्ता गेली म्हणून दुसणे देण्यापेक्षा महाराष्ट्र पिंजून काढला आणि संधी मिळताच सत्तांतर घडवून दगा देणाऱ्या मित्राचा कल्पने बाहेरचा हिशोब चुकता केला. पारंपारीक विरोधक राष्ट्रवादीचाही एक गट बरोबर घेऊन लोकसभेची वाट सुकर केली. राजकीय चमत्कारामुळे गोंधळलेल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना महाभारतात कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णानेही धर्म रक्षणासाठी अधर्म केला नव्हता तर ती कुटनिती होती याचा दाखला देत राजकारणात टिकून राहण्यासाठी काही तात्कालीक तडजोडी कराव्या लागतात हे पटवून दिले. तेंव्हा देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय चातुर्याची आणि क्षमतेची प्रचिती पुन्हा एकदा दिसुन आली.**

महाराष्ट्राचं राजकारण वर्षभरातील राजकीय घडामोडींनी ढवळून निघाल्याने सर्वसामान्यांसह राजकीय अभ्यासक, तज्ज्ञ आणि पत्रकारांची आवडती 'सूत्रे' यांनाही धक्का देणारे ठरले. राजकीय उलथापालथीत अनेक नावे येतात कालांतराने कमी होतात. मात्र एक नाव ध्रुवासारखं अढळ राहिले असुन या नावाशिवाय महाराष्ट्राचे राजकारण पूर्ण होऊ शकणार नाही इतका दबदबा फडणवीस यांनी निर्माण करुन टिकवून ठेवला आहे.

साडेतीन वर्षात झाले इतके राजकीय बॉम्बस्फोट यापूर्वी कधीच झाले नाही. शिवसेनेने काँग्रेस, राष्ट्रवादीला बरोबर घेऊन महाविकास आघाडीचे सरकार स्थापन केल्यानंतर एका उद्योगपतीच्या घराजवळ स्फोटकांनी भरलेली मोटारगाडी सापडल्याची घटना घडली आणि मार्च 2021 च्या विधीमंडळ अधिवेशनात देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची सर्व कुंडली बाहेर काढले आणि सरकार गर्भगळीत झाले. तेंव्हाच विरोधी पक्षनेता काय असतो याची झलक दिसली आणि एकटे देवेंद्र काय करणार ? असे कुत्सित भावनेने बोलणाऱ्यांचीच पाचावर धारण झाली. राज्यसभेच्या निवडणुकीत तर संख्याबळ नसताना भाजपचा तिसरा उमेदवार विजयी केला आणि विधान परिषदेच्या निवडणुकीतही राजकीय चमत्कार दाखवला तेंव्हा महाविकास आघाडीच्या नेत्यांना काही काळ नेमके काय झाले आहे ? हेच कळाले नाही. सत्ताधारी पक्षाचा चक्रव्यूह अचूक भेदण्याच्या फडणवीस यांच्या कर्तबागारीला शरद पवार यांनीही जाहीरपणे दाद दिली होती. महाविकास आघाडी दोन्ही निवडणुकीतील पराभवाच्या धक्क्यातून सावरण्याच्या पूर्वीच शिवसेनेचा एक गट एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली गुवाहाटीला रवाना झाला आणि तीन पक्षाचे सरकार कोसळले. एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री करत पक्षाच्या आदेशानुसार देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारत सत्तेच्या राजकारणात 'पुन्हा' आले. तर राष्ट्रवादीचे अजित पवार यांच्या गटालाही सत्तेत सहभागी करुन घेण्याची राजकीय खेळी देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या चातुर्याने यशस्वी करुन दाखवली. महाराष्ट्राच्या राजकारणात यापूर्वी कधीही होऊ शकले नाही असे वर्षभरात दोन पक्षातील मोठ्या बंडामुळे देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय क्षमतांची इतिहासात नोंदच झाली आहे. पारंपारीक विरोधी गटाला सोबत घेतल्यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांमधील उडालेला गोंधळ लक्षात घेऊन फडणवीस यांनी महाभारतात कुरुक्षेत्रावर कौरवांच्या बाजुचे कर्ण, दुर्योधन, जयद्रथ यांचा वध करताना श्रीकृष्णाने अधर्म केला नव्हता तर ती कुटनिती होती. धर्माच्या रक्षणासाठी काही वेळा काही निर्णय परिस्थितीनुसार घ्यावे लागतात. राजकारणात टिकून राहण्यासाठी आणि पक्ष वाढवण्यासाठी काही राजकीय तडजोडी करुन आपले उद्दीष्ट गाठावे लागते हे पटवून देत पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारण्यासाठी ऊर्जाच दिली. तेंव्हा देवेंद्र फडणवीस यांच्या दुरदृष्टी आणि राजकीय क्षमतांची प्रचितीच आली. फडणवीस यांच्या नेतृत्व गुणांचा आवाका प्रचंड मोठा आहे. हे हेरुनच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी 2014 मध्ये मंत्रीपदाचा कोणताही अनुभव नसताना वयाने एकदम तरुण असतानाही महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाची जबाबदारी फडणवीस यांच्यावर सोपवली. पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वाचा विश्वास सार्थ ठरवत फडणवीस यांनी पाच वर्ष अतिशय समर्थपणे आणि कोणत्याही आरोपाशिवाय निष्कलंकपणे आपला कार्यकाळ पूर्ण केला. दिवंगत वसंतराव नाईक यांच्यानंतर मुख्यमंत्री पदाची पाच वर्षाची कारकीर्द पूर्ण करणारे ते एकमेव ठरले. पाच वर्ष स्थिर सरकार आणि मुख्यमंत्री पाहण्यासाठी महाराष्ट्राला चार दशकांची प्रतिक्षा करावी लागली. वर्षानुवर्ष विरोधी बाकावर राहणारे, सत्ताधाऱ्यांना जेरीस असणारे,



सत्ताधारी म्हणून यशस्वी होत नाहीत या समाजालाही फडणवीस यांनी छेद दिला. अत्यंत तरुण वयात प्रगत राज्याच्या मुख्यमंत्री पदाची संधी मिळाल्यानंतर ते गडबडले नाहीत. किंवा जबाबदारीचे ओझे असल्यासारखे कधी दिसले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कारभार हाकताना कायम 'राजीनामे खिशात असल्याची भाषा करणाऱ्या मित्र पक्षाला' सोबत घेत त्यांनी विकासाला गती दिली. नैसर्गिक संकटाचा सामना करताना जाणीवपूर्वक निर्माण केलेल्या आव्हानांना सामोरे जाताना फडणवीस यांच्या नेतृत्व गुणाचा कस लागला. वेगवेगळ्या समाजघटकांचे आंदोलने यातून सरकार अस्थिर करण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर झाला. या सर्व आव्हानांना जीवाभावाच्या सहकाऱ्यांच्या साथीने यशस्वीपणे सामोरे गेले. नागपूर महापालिकेच्या सदस्यत्वापासून अवघ्या एकविसाव्या वर्षी सुरू झालेला फडणवीस यांचा राजकीय प्रवास आणि त्यांनी गाठलेलं यश मिळवलेला विश्वास हा एखाद्या पटकथे सारखाच आहे. महापौर झाल्यानंतर पक्ष संघटनेत विविध पदावर काम करत त्यांनी विधानसभेत प्रवेश केला. महाराष्ट्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष असताना लोकसभा निवडणुकीच्या वेळी राज्य पिंजून काढले. समवयस्क नव्या कार्यकर्त्यांची राज्यभर नाळ जोडली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्षाच्या विचारसरणीशी एकनिष्ठ राहून त्यांनी मिळवलेले यश अनेकांसाठी प्रेरणादायीच. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सबका साथ, सबका विकास' या मार्गावरून वाटचाल करताना फडणवीस यांनी सहकाऱ्यांचा सल्ला घेऊन, मित्रपक्षाला चुचकारून आणि प्रसंगी विरोधकांना विश्वासात घेऊन विकासाचा अजेंडा पुढे नेला. सरकारचा कारभार पारदर्शक, सर्वसमावेशक असावा. हे सूत्र त्यांनी मुख्यमंत्री असताना कायम पाळले. जलयुक्त शिवार, मराठवाडा वॉटर ग्रीड या दोन कामांबद्दल ते मराठवाड्याच्या सदैव लक्षात राहतील. ग्रामीण भागाच्या विकासाला केंद्रस्थानी ठेवताना त्यांनी शहरी भागाकडे दुर्लक्ष होऊ दिले नाही. त्याचे अनेक उदाहरणे देता येतील. संधी मिळाल्याशिवाय तरुणांना आपले गुण दाखविता येत नाही, याची जाणीव असल्यानेच त्यांनी मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमामुळे होतकरू व नवोन्मेषी तरुणांना फायदा झाला. त्यांना प्रशासनात काम करण्याचा थेट अनुभव मिळाला. पुणे मेट्रो व समृद्धी महामार्ग या कामांना समन्वयातून गती दिली. नागपूर येथे उभारलेले जागतिक दर्जाचे कॅन्सर हॉस्पीटल रुग्णांच्या आशेचे किरण बनले. शेतकरी कर्जमुक्ती, थेट जनतेतून नगराध्यक्ष, सरपंच संकल्पना ही नव्या नेतृत्वाची पेरणीच आहे.

शेतकऱ्यांचे आंदोलन व मराठा क्रांती मोर्चा हे संवेदनाशील विषय फडणवीस यांनी अत्यंत आपुलकीने हाताळले. राजकारणापेक्षा माणूस मोठा, ही त्यांची भावना या दोन्ही आंदोलनांच्या वेळी विशेषत्वाने जाणवली. फडणवीस यांच्या कामावर सामान्य जनता खूश असल्याचे 2019 च्या विधानसभा निवडणूक निकालातून स्पष्ट दिसले. परंतु राजकीय उलथापालथीने फडणवीस यांना विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी स्वीकारावी लागली. याच काळात कोरोना महामारीचे संकट आले. राज्यकर्ते घराबाहेर पडत नसताना फडणवीस यांनी राज्य पिंजून काढले. सर्वसामान्य माणसांच्या अडचणी समजून घेत त्या दूर करण्यासाठी अहोरात्र झटले हे उभ्या महाराष्ट्राने पाहिले. विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी विधानसभेची अधिवेशने गाजवली. संसदीय आयुधांचा वापर कधी, कसा आणि किती नेमकेपणाने करायचा याचा वस्तुपाठच फडणवीस यांनी घालून दिला. फडणवीस यांची कामगिरी विरोधी पक्षनेता की मुख्यमंत्री म्हणून श्रेष्ठ ? असा प्रश्न पडतो. विरोधी पक्षनेता म्हणून काम करताना त्यांच्यातील आक्रमकता, प्रश्न धसाला लावण्याची वृत्ती प्रकर्षाने दिसली. तर मुख्यमंत्री म्हणून अतिशय संयमाने, सर्वसमावेशक काम जाणवले. राजकीय कुरुक्षेत्रावर चक्रव्यूहात शिरण्याचे धाडस अनेक जण करतात. पण चक्रव्यूह भेदण्याची कर्तबगारी दाखविणारे देवेंद्र फडणवीस यांच्यासारखे थोडेच असतात. गृहमंत्री म्हणून अनेकदा संवेदनशिल विषय हाताळताना नेतृत्वाचा कस लागतो. ती प्रगल्भता फडणवीस यांच्या ठायी अनेकदा दिसुन आली. आश्वासनांची पूर्तता करणारे आणि शब्दाला जागणारा नेता म्हणून त्यांची ख्याती आहे. कोणालाही त्यांच्याशी संपर्क करणे सहज शक्य असते, ही त्यांची खुबी अनेक राजकीय नेत्यांना थक्क करणारी आहे. घरातून राजकीय बाळकडू मिळाले असले तरी त्यांनी इतर राजकीय नेत्यांप्रमाणे साखर कारखाने, शिक्षण संस्था काढण्यात वेळ घातला नाही तर पक्षाला मजबूत करण्यासाठी समर्पित भावनेने काम केल्यामुळे प्रतिकूल परिस्थितीतही पक्ष मजबूत झाला आहे तो त्यांच्या नेतृत्वामुळेच. राजकीय सत्तांतरात एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री करुन स्वतः उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारत त्यांनी मनाची उदारता दाखवली. तर अजित पवारांना उपमुख्यमंत्री करत अर्थ खाते देऊन बरोबर येणाऱ्या नेत्याला सन्मान देण्याचा मोठेपणाही त्यांनी दाखवला. त्यामुळे राजकीय पटलावर इतरांना सन्मान आणि मोठेपण देणारा जनतेच्या मनावर अधिराज्य करतो. त्यामुळेच फडणवीस यांना राजकारणातील महानायक समजले जात आहे. अशा सर्वव्यापी, धुरंधर नेतृत्वाला वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा....!

## सत्ताहरण की सत्तेसाठी वस्त्रहरण



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**रामायण व महाभारत काळापासून हरण आणि वस्त्रहरण हे दोन शब्द रूढ आहेत. या दोन्ही शब्दाचा अर्थ अगदी सरळ सरळ आहे. प्रदीर्घ काळापासून हे दोन्ही शब्द फारसे ऐकण्यात येत नाहीत. केव्हातरी समाजकारणात जुनेजाणते लोक याचा आजही उपहासाने उल्लेख करतात. विशेषतः आजची तरुणाई तर इंग्रजी आणि सेमी इंग्रजीत शिकत असल्यामुळे अशा शब्दाकडे ढुंकूनही बघत नाहीत. अशा व्यावहारिक शब्दार्थाकडे त्यांचे लक्षही जात नाही. वर्तमानात सर्वत्र घरादारापासून ते गल्लीबोळात या इंग्रजीचा बोलबाला असल्यामुळे सर्वत्र माय मराठीचा विसर पडत आहे. इंग्रजी भाषा परिपूर्ण येवो अथवा न येवो परंतु अशिक्षित लोकही मराठीला पायदळी तुडवून सर्रासपणे विसरून हॅलो-हाय-फाय ची संस्कृती मोठ्या प्रमाणात रूढ होत आहे . समाजाचे काही का असेना, काही का होईना परंतु आपल्या महाराष्ट्रातील वर्तमान राजकारणी लोकांनी फोडा-झोडांची संस्कृती अंगीकारून हरण आणि वस्त्रहरण या शब्दाला उधाण आणले आहे.**

माझ्यासारखे विद्रोही लिखाण करणारे काही तरी शब्दांची तोड-फोड करून राजकारण्यांच्या कलागुणात काहीतरी रंगत भरण्याचा प्रयत्न करून जनमानस व वाचक वर्गाची करमणूक करत असतात. कुठल्याही विषयावर भाष्य करत असताना वाचकांची वाचन संस्कृती जिवंत राहून समाजात अशा लिखाण माध्यमातून राजकारण व समाजरचनेचे वास्तव प्रखरतेने समोर ठेवण्याचा हा एक शुल्लक प्रयत्न.महाराष्ट्राच्या वर्तमान राजकीय परिस्थितीवर माझे मतप्रदर्शन करत असताना वर्षभरापासूनची राजकीय परिस्थिती बघून रामायण व महाभारत कालीन हरण व वस्त्रहरण हे शब्द आठवले. म्हणूनच तत्कालीन परिस्थिती व वर्तमानातील राजकीय परिस्थितीत बरेचसे साम्य वाटले म्हणूनच मुद्दामच अशा शब्दांच्या उल्लेखानुरूप महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीत बऱ्याच अंशी साधर्म्य वाटते. रामायणात स्त्री लोभापाई रावणाने सीता हरण करून लंकेसह आपला सबंध वंश बुडविला. दुसरीकडे अहंकार व पुत्र प्रेमापोटी सर्व काही समजून उमजून देखील धृतराष्ट्र व दुर्योधनाने द्रौपदीचे वस्त्रहरण करून महाभारत घडविले. अगदी अशीच अस्थिर परिस्थिती महाराष्ट्राच्या राजकारणात महाविकास आघाडी सरकार स्थापनेपासून सुरू झालेली आहे. सत्ता हव्यासापोटी पंचवीस तीस वर्षापासूनची स्व. बाळासाहेब ठाकरे व महाजन-मुंडे जोडीने प्रामाणिकपणे भाजप-शिवसेनेची केलेली नैसर्गिक युती तोडून उद्धवरावांनी मुख्यमंत्रीपदाचा स्वार्थापायी काटेरी मुकुट आपल्या माथी ठेवला तेव्हापासूनच भाजप चाणक्याच्या गोटात खळबळ सुरू झाली. याची परिणीती अखेर देवेंद्रजींनी सेनानिष्ठ एकनाथाला सोबत घेऊन उद्धव सेनेचे हरण केले. अर्थातच सेनेच्या घराणेशाहीला सुरुंग लावून एकनाथाला लोकनाथ म्हणून मुख्यमंत्रीपदी बसविले. परत लगेचच भाजपचे चाणक्य म्हणून मिरविणाऱ्या देवेंद्रजींनी आपल्या जुन्या अपमानाचा बदला घेण्यासाठी जाणता राजा म्हणून शेखी मिरविणाऱ्या राष्ट्रवादीच्या सर्वेसर्वा, जाणता राजाला जबरदस्त क्लीन बोल्ड केले. म्हणजेच राष्ट्रवादीचे ही वस्त्रहरण करून काका पुतण्यात ठिणगी टाकून पुतण्याला आपल्या गोटात घेत सर्व वर्तमान महाराष्ट्रच्या राजकारणात हरण व वस्त्रहरण सारख्या घडामोडी घडविल्या. सर्व हरण व वस्त्रहरणाचे रामायण व महाभारत महाराष्ट्राच्या राजकारणात घडत असताना सर्व बाजूंनी कुठेही नैतिकता व नीती मूल्यांचा अजिबात विचार झालेला नाही असे तमाम महाराष्ट्राच्या जनतेला वाटत आहे. एक लोकप्रतिनिधी म्हणून निवडून दिल्यावर जनतेला त्यांनी नीतिमूल्य जपून राज्यकारभार असावा असे अपेक्षित असते परंतु वर्तमान राजकीय परिस्थितीत पुढाऱ्यांच्या वागणूक व स्वभावाचे मूल्यमापन करत असताना अशा नीतीमुल्यांची अपेक्षाच नसते. तूर्तास तरी सर्वत्र राजकारणात संस्कार व नीतीमूल्य कुणाकडेही शिल्लक नाहीत हेच दिसून येते. स्वार्थ व सत्तेपायी सबकुछ माफ अशीच वर्तमान राजकारणाची अवस्था झाली आहे. थोडक्यात म्हणजे भ्रष्टाचाराच्या समुद्रात बुडालेले सर्वच पक्षाचे पुढारी सत्ता हव्यासापाई काहीही व कसेही करू शकतात हेच दिसून येते. एखादी अपवित्र वस्तू तुलसी जल किंवा गंगाजलात बुडवून पवित्र करून वापरत घेतली जाते तद्वतच राजकीय पुढार्यांची अवस्था झालेली आहे. वर्तमान राजकारणात कुठेही संस्कार व नीतीमूल्यांची चाड राहिलेलले पुढारी शिल्लक नाहीत. अशा फोडा झोडाचा खेळ करून सत्ता मिळविणाऱ्यांच्या बाबत जनमनात खळबळ चालू आहे. शेवटी भाजपच्या चाणक्यांनी असे का केले ? हे तर स्वतःला खूपच पवित्र समजतात, जनता यांना पवित्र समजते की नाही हे जनताच ठरवील. पण आम्ही सामाजिक, राजकीय नीतिमूल्य सांभाळूनच हे सर्व करत असतो असा उसना आव आणता तरी कशाला ? करोडो रुपयांचे घोटाळे करणारे घोटाळेबाज लोकप्रतिनिधी आपला जीव वाचविण्यासाठी यांच्या कळपात सामील झाले की हे पवित्र झाले असेच भाजपला वाटते, याचाच अर्थ "सौ चुहे खा के बिल्ली हज को चली" असे समजण्यास हरकत नसावी. काही का असेना वर्तमानात लोकप्रतिनिधी सत्ता व पैशासाठी कुठल्याही थराला जाऊन राजकारण व समाजकारण करतात हे जनतेने ओळखले आहे म्हणूनच "आधी हरण नंतर सत्तेसाठी वस्त्रहरण" करून भाजपाने महाराष्ट्राच्या राजकारणात नवीन रामायण-महाभारताची नक्कीच सुरुवात केली आहे. शेवटी असेच म्हणावे लागेल इस दुनिया मे सब चोर ही चोर, कोई छोटा चोर, तो कोई बडा चोर.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# दीपक शेजवळच्या मारेकऱ्यांना कठोर शासन करण्याची मागणी

## मानवहीत लोकशाही पक्षाचे तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** तालुक्यातील जातेगांव ता.फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर येथील मातंग समाजातील दीपक गोविंद शेजवळ या तरुणाचा दि.३/०७/२०२३ रोजी सकाळी गावातील जि.प.प्राथमिक शाळेच्या प्रांगणातील तीन ते चार फुट उंच असलेल्या पाईपला फाशी घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला होता. मात्र सदरील तरुणाने आत्महत्या केलेली नसून अत्यंत सुनियोजितपणे कट रचून हत्या केल्याचे घटनास्थळाला भेट दिली असता दिसुन आले आहे.

त्यामुळे हा घातपात झाल्याचा दाट संशय असुन तिन ते चार फुटाच्या लोखंडी पाईपला पाच ते साडे पाच फुटाचा व्यक्ती फाशी घेऊ शकत नाही. मृतदेह आढळला त्यावेळी मृत तरुणाचे हात खिशात होते तसेच तो मांडी मारुन खाली बसलेला होता, त्याच्या खिशात असलेला मोबाईल सुद्धा गायब झालेला होता ,तरुणाच्या अंगात टी शर्ट व जिन्स पॅट रात्री पाऊस पडल्यानंतरही सकाळी कोरडेच होते, तरूणाच्या गळ्याला फास आवळल्यानंतर घटनास्थळी असलेला चिखल सुद्धा कपड्याला किंवा चप्पलला लागलेला नाही त्यामुळे आज्ञात व्यक्तीने सदरील तरुणाचा शाळेच्या आजुबाजुला खून करुन मृतदेह शाळेच्या प्रांगणात लोखंडी पाईपला लटकविल्याचा पिडीत कुटुंबाचा व मानवहीत लोकशाही पक्षाचा आरोप आहे.

सिल्लोड तालुक्यातील मानवहीत लोकशाही पक्षाच्या शिष्टमंडळाने सिल्लोड तहसीलचे तहसीलदार यांची भेट घेऊन अज्ञात मारेकऱ्याचा लवकरात लवकर शोध घेऊन त्यांच्याविरुद्ध खुनाचा खुनाचा गुन्हा दाखल करून पिडीत कुटुंबाला न्याय देण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सदरील घटनेचा तपास लवकरात लवकर न लागल्यास,पोलीस तपासांत हलगर्जीपणा किंवा आरोपीस पाठीशी घालण्याचा प्रयत्न झाल्यास मानवहीत लोकशाही पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिनभाऊ साठे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा मराठवाडा कोषाध्यक्ष सखाराम अहिरे यांच्या वतीने देण्यात आला.

यावेळी मानवहीत लोकशाही पक्षाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब गायकवाड, युवा तालुकाध्यक्ष फकीरचंद तांबे, तालुका उपाध्यक्ष बाबुराव अहिरे, तालुका सचिव संजय कांबळे, युवा तालुका सचिव रतन अंभोरे, युवा तालुका कार्याध्यक्ष दादाराव सिरसाठ,युवा तालुका कोषाध्यक्ष भिकन कांबळे,सामाजिक कार्यकर्ते शंकर पारधे , सामाजिक कार्यकर्ते विष्णू साळवे,राजु खेत्रे, ज्ञानेश्वर खरात, विशाल जाधव, आप्पा गायकवाड आदी पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# मत्स्योदरी देवीची दानपेटी फोडून अंदाजे ५ लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास

आधुनिक केसरी न्यूज



**अंबड :** मराठवाड्याचे आराध्य दैवत श्री मत्स्योदरी देवी मंदिराच्या गाभाऱ्यात असलेली दानपेटी कटरच्या मदतीने कट करून अंदाजे ५ लाख रूपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केल्याची प्राथमिक माहिती तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी पोलिसांना दिली आहे.

जालना जिल्ह्यासह मराठवाड्याचे आराध्य दैवत असलेल्या अंबड येथील श्री मत्स्योदरी देवी मंदिराच्या गाभाऱ्यात असणारी दानपेटी गुरुवारी दि. 20 रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी मंदिरात प्रवेश करून गाभाऱ्यात असलेली दानपेटी कटरच्या मदतीने कट करून पेटीत असलेली अंदाजे 5 लाख रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना शुक्रवारी सकाळी मंदिराचे पूजारी पूजा करण्यासाठी गाभाऱ्यात गेल्याने उघडकीस आली आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिस अधिक्षक तुषार दोषी, पोलिस उपअधीक्षक चैतन्य कदम,उपविभागीय पोलिस अधिकारी मुकुंद आघाव, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक रामेश्वर खनाळ,स. पो.नी.योगेश चव्हान,आदिनाथ ढाकणे यांच्या सह श्वान पथक तसेच ठसे तंज्ञ यांच्यासह पोलिसांचा फौजफाता घटनास्थळी दाखल झाला आहे. श्री मत्स्योदरी देवीचे सिसिटीव्ही कॅमेरे तांत्रिक अडचणीमुळे बंद पडले असल्याचे समजते. त्यामुळे गाभाऱ्यात शिरलेल्या चोरट्यांचे निदान होण्यास मदत मिळू शकली नाही.

श्री मत्स्योदरी देवी मंदिरात चोरी झाल्याचे मंदिराचे पूजारी गीता विलास कुठेफळकर यांनी मला माहिती दिली . मला माहिती मिळताच मी पोलिसाना कळविले . मंदिराची तिजोरी प्रत्येक सहा महिन्याला फोडली जाते . यामध्ये साधारणपणे 6 लाखांच्या आसपास रक्कम जमा होते . पुढील महिन्यात दानपेट्या खोलणार होतो . – **चंद्रकांत शेळके**




# तंबाखूजन्य पदार्थांच्या जाहिरातीवर बंदी आणा : आमदार प्रतिभाताई धानोरकर

आधुनिक केसरी न्यूज






**चंद्रपूर :** राज्यात तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी आहे. परंतु राज्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणात तंबाखूजन्य पदार्थाची सर्रास विक्री करण्यात येत आहे. या तंबाखूजन्य पदार्थामुळे अनेक युवकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. कर्करोग सारख्या आजारांनी तरुण ग्रासले जात आहे. अनेक ठिकाणी गांजाची खुलेआम विक्री होत आहे. यामुळे चंद्रपूर सह राज्यात हजारो युवक तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाने मृत्युमुखी पडले आहे. परंतु सरकार छोट्या वाहनधारकांवर कारवाई करीत आहे. मात्र, मोठ्या कंपन्यांवर व तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्री करणाऱ्यां मोठ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करत नसल्याचा आरोप आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी केला आहे. त्यासोबतच तंबाखूजन्य पदार्थांच्या जाहिरातीवर बंदी आणण्याची लोकहितकारी मागणी देखील त्यांनी केली आहे.

मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरात सांगितले कि, प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या वाहतुकीसाठी व साठवणुकीसाठी पुनर्वापर न होण्याकरिता सदर वाहन जप्त करण्याबाबत तसेच, सदर जागा किंवा गोदाम सील करण्याबाबतचे आदेश देण्यात आले आहे. तसेच गुटखा, पानमसाला व इतर तत्सम प्रतिबंधित अन्न पदार्थांची वाहतूक करणाऱ्या वाहनांचा वाहतुकीचा परवाना तसेच वाहन चालकाचा परवाना रद्द करण्याबाबत संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाला सूचित करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच अवैध गुटखा विक्री रोखण्यासाठी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ व नियम २०११ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येत असल्याचे सांगितले.

या नियमानुसार कारवाई फक्त लहान व्यापाऱ्यांवर करण्यात येत असून मोठ्या तस्करांना अभय देण्यात येत आहे. येत्या काळात फक्त महाराष्ट्रात तंबाखूजन्य पदार्थावर बंदी कागदावर न राहता वास्तविक करण्यासाठी प्रभावी कारवाया कराव्यात. तसेच कायद्यामध्ये देखील अधिक प्रभावी शिक्षा करण्यात यावी याकरिता पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी सांगितले.

महाराष्ट्र Business Katta









# अहो, जावईबापू आला धोंड्याचा महिना, पण वाण काय द्यावं सुचेना



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी


**उद्याच्या 18 जुलैपासून पुण्यकर्म असलेल्या अधिक मास अर्थात पुरूषोत्तम तथा ग्रामीण भागातल्या भाषेत बोलायचं झालं तर धोंड्याचा महिना, अहो जावाईबापु आलाय धोंड्याचा महिना, पण वाण काय द्यावं सुचेना?कालगणनेप्रमाणे तीन वर्षातून एकदा येणारा अधिक महिना ज्याला तेरावा महिना म्हणून ओळखल्या जाते. त्याची सांगता 16 ऑगस्ट रोजी होते. या मासात नित्य व नैमित्तिक कर्मे करावीत. काम्य कर्माचा आरंभ जे केल्यावाचून गती नाही अशी कर्म करावीत असं शास्त्र सुचित करतं. दरम्यान 33 अनारसे, चांदीचे पात्र, त्यावर तांब्याचा दिवा अन् जावाईबापुचा थाट सासरवाडीतून केला जातो. वर्तमान सामाजिक व्यवस्थेत जावाईबापुला धोंडा देताना त्यानं आई-वडिलांची सेवा करावी आणि आपली मुलगी पण त्या घरची सुन तिने सासु-सासरे आई-वडिलांसारखे धरून कर्तव्य पार पाडावीत. तरंच चांदीने बनलेले अनारसे ज्याचा गोडवा आयुष्यभर टिकुन राहिल हे मात्र नक्की.**

भारतीय संस्कृती विविध शास्त्र अध्यात्म, रूढी परंपराने नटलेली असून सण-उत्सव हे खर्‍या अर्थाने पारंपारिक संस्कृतीचं दर्शन वर्षानुवर्षे हिंदु धर्मात पाळल्या जाते. सौरमान आणि चांद्रमान या दोन्ही कालगणनेत प्रत्येक वर्षी अकरा दिवसाचा फरक तीन वर्षात 33 दिवसाचा होईल ते टाळण्यासाठी अधिक मासाची योजना ज्याला भगवान श्रीकृष्ण पुरूषोत्तम मास असे म्हणतात. उद्याच्या 18 जुलैपासून प्रारंभ आणि 16 ऑगस्टला समाप्ती. एक महिन्याचा कालावधी सत्य पात्र पुण्यकर्म अर्थात जेवढं चांगलं सकारात्मक हातुन घडेल. मग अध्यात्मिक अनुष्ठान हिंदु देवाधिकांची पुजा एवढेच नव्हे तर सत्पात्री दान, परोपकार कर्म आणि मानवता कल्याण आदी सरळ मार्ग संसार जीवनात गाठण्यासाठी पुण्यकर्म ज्या मासात केले जावे त्यासाठी याची रचना अनादिकाळापासुन केलेली आहे. आपल्याकडे अधिक मास हा शब्द पण ग्रामीण भागात ज्याला धोंड्याचा महिना ज्या महिन्यात सासरी गेलेली मुलगी जावायासह बोलावणे आणि धोंडा देताना मग अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे यथोचित स्नेहभोजन तथा 33 अनारसे चांदीच्या ताटात वस्त्रालंकार जसं घडेलं तसं. हे स्वरूप या मासाचं असुन ज्याला जावाईबापुचा सन्मान मास असं देखील म्हणु शकतो. सरलेल्या उन्हाळ्यात ज्यांचं विवाह कार्य झालं त्यांच्यासाठी तर हा उत्सव दिवाळी पर्वणीसारखा म्हणावा लागेल. काय कर्मे करावीत ? आणि काय करू नयेत ? या धर्मशास्त्राने अनेक गोष्टी सांगितलेल्या आहेत तो भाग वेगळा. जावायाला दान खरं स्वरूप या अधिक मासाचं म्हणावे लागेल. पुण्यकर्माचा भाग म्हणून मोठ्या मोठ्या तीर्थक्षेत्रावर देवाधिकांच्या दर्शनासाठी भाविक भक्त जातात. बीड जिल्ह्यात माजलगाव तालुक्यात पुरूषोत्तमपुरीला पुरूषोत्तमाचं ऐतिहासिक मंदिर जाज्वल्य दैवत म्हणुन ओळखल्या जाते. अलीकडे मराठवाड्याच्या कानाकोपर्‍यातुन भाविक भक्त दर्शनासाठी गोदावरी काठेवर येतात. अर्थात आजही तिथे जायला चांगला रस्ता नसुन तीर्थक्षेत्रावर सुधारणा होण्याची गरज वाटते. उद्याच्या 18 जुलैनंतर या पर्वकाळाचा प्रारंभ मग प्रत्येकाच्या घरात जावायाला बोलावण्याची लगभग. काय वाण द्यायचं ? त्यावर कुटुंबात चर्चा सुरू असते. घडेल तसं दिले जाते. पण या निमित्ताने वर्तमान सामाजिक व्यवस्थेत एका गोष्टीची नोंद घ्यावी वाटते आणि ती आता सांगण्याची गरज आली. अलीकडे जन्मदात्या माता-पित्यांची आपल्या



लेकरांकडूनच मोठ्या प्रमाणावर हेळसांड सुरू असुन पोटाला जन्मलेली अनेक कारटी जी आपल्या आई-वडिलाला वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवतात. एव्हाना बाहेरून आलेली सुन तिला देखील सासु-सासरे हा बोज वाटतो. कारण कर्तव्याची जाणिव अभावाने जाणवते. पण या अधिक मासाच्या निमित्ताने पुण्यकर्म जर करायचं झालं तर आपल्या लेकीला ज्या कुटुंबात दिले तिथे सासु-सासर्‍याची सेवा तेच आई-वडिल समजुन करावी हे वाणाच्या रूपाने सांगण्याची गरज वाटते आणि जावाईबापुला 33 अनारसे देताना त्याच्या कानात सरळ सांगा, की जावाईबापु तुम्ही तुमच्या आई-वडिलांचा श्रावणबाळासारखा सांभाळ करा, आमची लेक तुम्हाला खंबीर साथ देईल. कारण तिचे आई-वडिल आणि तिचं दैवत हेच सासु-सासरे आहेत. तेवढीच अपेक्षा लेक घरी आल्यानंतर करा आणि तिला शिकवण द्या. जावाईबापुला धोंडा द्या पण ज्याचा मेंदू धोंड्यासारखा झाला ज्यामुळे त्यानं जन्मदात्यालाच वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवला तो धोंडारूपी मेंदू तंदुरूस्त कसा राहिल ? या चार चांगल्या गोष्टीची शिकवण वाणाच्या रूपाने सासुरवाडीतुन आता मिळवुन देण्याची गरज वाटते. बाकी काही असलं तरी परम जावाईबापुचा सन्मान आणि प्रतिष्ठा वाढवणारा हा अधिक मासाचा महिना असुन पुण्यकर्म हेच की ज्याला त्याला जबाबदारीची जाणिव आणि कर्तव्य सांगण्याची गरज वाटते. आपल्या लेकीच्या पावलाने त्या घराचं सौभाग्य हे कौटुंबिक सुखाचा आनंद घेण्यासाठी आई-वडिलांनी देखील विशेषतः आईनं लेकीला आदर्श कुटुंबाची शिकवण सांगण्याची गरज आता निर्माण झालेली आहे. बाकी रितीरिवाजाप्रमाणे केवळ अनारसेच नव्हे तर जसं घडेल तसं अगदी चांदीच्या ताटात 33 सोन्याचे अनारसे दिले तरी जावाईबापुसाठी कमीच ना ? मग तो नाही तर म्हणतच नाही. पण सासुरवाडीवर कमालीचा खुष झाल्याशिवाय रहाणार नाही. चला तर मग सासुरवाडीला जावुया मनमुराद धोंडे खाऊया.

# सशस्त्र क्रांतीचा महामेरू चंद्रशेखर आझाद



प्रा. गणपत बरसमवाड
खैरकावाडी, जि. नांदेड

आधुनिक केसरी

**आपल्या कर्तुत्वाने पराक्रमाने ज्या लोकांनी इतिहास घडविला त्या असामान्य व्यक्तीचे स्मरण व्हावे; त्यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती नवीन पिढीला व्हावी त्यांच्या कार्यातून प्रेरणा मिळावी व त्यांच्यासारखे असामान्य कार्य नवीन पिढीच्या हातून घडले जावे; पारतंत्राच्या जुलमी गुलामगिरीतून आपल्या भारत मातेच्या स्वातंत्र्याकरिता प्राणाची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांचा आदर्श आपण घ्यावा व त्यांच्या बलिदानातून मिळालेल्या स्वातंत्र्याची मधुर फळे चाखताना त्यांच्या पराक्रमाचे गोडवे या पुढील पिढीने गावेत यासाठी इतिहासाचे एकत्रित लेखन केले आहे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत नक्षत्रासारख्या दैदिप्यमान अशा महान व्यक्तींनी महाराष्ट्रातील तरूणांच्या मनात नवचैतन्य निर्माण करण्याचे महान कार्य क्रांतिचे महामेरू चंद्रशेखर आझाद यांनी केले. त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांनी केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा आपण या लेखात करून घेणार आहोत त्यानिमित्ताने हा शब्द प्रपंच. ...**

इसवी सन 1600 मध्ये व्यापारासाठी भारतात दाखल झालेल्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने साम्राज्यवादी धोरणाचा पुरस्कार करून संपूर्ण भारत आपल्या वर्चस्वाखाली आणला. महासागरामध्ये अचानक उद्भवलेल्या वादळाचा किनाऱ्याला तडाखा बसून विध्वंस व्हावा; अगदी तशाप्रकारे अल्पावधीतच होत्याचे नव्हते पाहण्याची वेळ भारतीयांना आली. इंग्रजांच्या अंगी गोचीड स्वभाव धर्म होता. स्वभाव धर्मानुसार त्यांनी भारतीयाचे आर्थिक शोषण केले. अन्याय,अत्याचार, जुलूम, जबरदस्ती सहन करणे भारतीयांच्या दृष्टीने नित्याचेच बनले होते मात्र सहन शीलतेला देखील मर्यादा असते असे म्हटले जाते

**आलेलं दुःख पचवलं की, जगण्याची उमेद भेटते । जिथे झाडाला घाव घातला जातो, तिथेच नवी पालवी फुटते ।।**

अन्याय ,अत्याचार ,जुलूम, शोषण या मार्गाने इंग्रजांनी भारतीयांच्या स्वाभिमानावरती घाव घातला आणि त्याचा परिणाम म्हणून भारतीयांच्या मनात क्रांतीची नव-पालवी फुटली क्रांती अगोदर मनात जन्मते, मगच ती व्यवहारात उतरते. क्रांतिवीर चंद्रशेखर आझाद यांचा जन्म 23 जुलै 1906 रोजी तक्षशिला जवळच्या भावरा नावाच्या छोट्या खेड्यात झाला, त्यांच्या आईचे नाव जगदानी देवी तर वडीलाचे नाव पंडित सिताराम तिवारी होते. स्वातंत्र्याच्या आंदोलनाचा काळ असल्यामुळे भारतात सर्वत्र इंग्रजां विरुद्ध असंतोष पसरला होता. विविध प्रकारचे निषेध, आंदोलने, मोर्चे, निदर्शने,चळवळी, सभा आपापल्या परीने स्वातंत्र्य मिळवण्यासाठी लोक करत होते. परदेशी कपड्यावर बहिष्कार टाकण्यासाठी आंदोलन सुरू झाले. जागोजागी कपड्याच्या होळ्या केल्या गेल्या.इंग्रज सरकारचा निषेध करून संताप व्यक्त करण्यात आला. इंग्रजांनी भारतातून कच्चा माल नेऊन तिकडून पक्का माल तयार करून आणून दुहेरी राजनीती अवलंबून भरमसाठ नफा कमवला. आपल्या देशाची आर्थिक लूट चालवली होती. तेव्हा चंद्रशेखर आझाद यांच्या कानावर इंग्रजांनी केलेल्या अन्याय अत्याचाराच्या गोष्टी आल्या. त्यावेळी त्यांनी इंग्रजांना भारतातून हाकलून दिले पाहिजे. अशा विचारांची ज्योत त्यांच्या मनामध्ये पेरली गेली आणि तेथूनच क्रांती कार्याला त्यांनी सुरुवात केली. बनारस येथे त्यांनी संस्कृतचा अभ्यास केला त्यात लघुकौमुदिनी आणि अमरकोश हे ग्रंथ कंठस्थ केले व तसेच स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभागी होऊन आपण या देशाचे काही तरी देणे लागतो म्हणून कमी वय असताना सुद्धा ते स्वातंत्र्य लढ्यात सामील झाले, महात्मा गांधींजीनी चालवलेल्या असहकार चळवळीत ते पकडले गेले त्यावेळेस इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना 15 फटके दिले. त्यावेळी ते न डगमगता तेवढे फटके सहन केले. एवढ्या छोट्या मुलाला फटके दिल्यामुळे भारतीय लोकांच्या मनात इंग्रजांविषयी चीड निर्माण झाली. ब्रिटिश सरकारच्या हाती सत्ता असल्यामुळे असा अन्याय, अत्याचार केला जातो म्हणून लोक एकत्रित आले, तेव्हापासूनच चंद्रशेखर आझाद जणू काही स्वातंत्र्य लढ्यासाठी जन्माला आले होते ते अनेक क्रांतिकारकांना मिळाले, शांत बुद्धीने आणि कसल्याही अडचणीला न डगमगता त्यांनी कार्य आपल्या हातात घेतले.चपळ आणि मजबूत शरीर लाभलेल्या चंद्रशेखर आझाद नेमबाजी मध्ये ही अत्यंत तरबेज होते. भगतसिंग त्यांना गुरु मानत असत, भारतीयांना अतिशय त्रास देणारा अधिकारी म्हणजे सॉर्डर्स याला ठार मारण्याची योजना क्रांतिकारक भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांनी आखली होती. ऐनवेळी चंद्रशेखर आझाद यांना ही या योजनेमध्ये सामील करून घेण्यात आले. नियोजनाप्रमाणे कार्याची आखणी केली गेली, सॉर्डर्स कचेरी मधून बाहेर आल्याबरोबर अचूक नेम साधून ठरल्याप्रमाणे त्याच्यावर गोळीबार केला तेथेच त्याचा अंत झाला.तेव्हा लाहोर शहरातून बाहेर निसटायचे होते .पोलिसांनी संपूर्ण शहरांमध्ये बंदोबस्त वाढवला, नाकेबंदी केली, क्रांतीकारकांनी वेगळा वेश धारण करून नाव बदलून पोलिसांच्या लक्षात येऊ नये म्हणून पोलिसांच्या डोळ्या देखत रेल्वेत बसून तेथून निसटले, त्यावेळी चंद्रशेखर आझाद यांनी वेगळी शक्कल लढवली जणू काही ते परमेश्वराचे भक्त आहेत असा देखावा त्यांनी उभा केला. मथुरेला तीर्थयात्रेला जाणाऱ्या भाविकांमध्ये ते मिसळून गेले आणि निसटून जाण्यात यशस्वी झाले, काही दिवस ते मठात राहिले, भूमिगत होऊन खडतर जीवन जगले. 9 ऑगस्ट 1925 रोजी काकोरी रेल्वे स्टेशनवर चंद्रशेखर आझाद व त्यांच्या सहकाऱ्यांनी रेल्वेतील सरकारी खजिना लुटला.कारण त्यांना शस्त्र खरेदीसाठी पैसा हवा होता. तेव्हा पंडित रामप्रसाद बिस्मिल यांच्या कल्पकतेतून ही कल्पना पुढे आली. काकोरी रेल्वे स्टेशन वर घडलेली घटना इतिहासात काकोरी कट म्हणून प्रसिध्द झाली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी चंद्रशेखर आझादानी जीवाचे रान केले. एकदा त्यांना अटक करून कोर्टात घेऊन जाण्यात आले तेव्हा न्यायाधीशांनी त्यांना विचारलं. तुमचं नाव काय ? त्यावेळेस ते म्हणाले आझाद वडिलांचे नाव काय ? स्वतंत्र राहण्याचे ठिकाण जेल अशा प्रकारचे सडेतोड व निडर पणे उत्तरे दिल्यामुळे ते ही चिडले, सरकारने तत्काळ कारवाई करून



क्रांतिकारकांना अटक केले आणि अनेक जणांवर खटले चालविण्यात आले .अशफाक उल्ला खान ,रामप्रसाद बिस्मिल, रोशन सिंग, राजेंद्र लाहिरी यांना फाशी देण्यात आले चंद्रशेखर आझाद मात्र पोलिसांच्या हाती कधी ही सापडले नाहीत.
अशा कितीतरी घटना इतिहासामध्ये आपल्याला स्फूर्ती आणणा-या आहेत. समाजवादी विचारांनी प्रभावित झालेल्या अनेक तरुणांनी क्रांतिकारक संघटना उभी करण्याचे ठरवले हे क्रांतिकारक धर्मनिरपेक्ष विचारसरणीचे होते.1928 साली दिल्लीच्या फिरोज कोटला मैदानावर झालेल्या बैठकीमध्ये हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन या संघटनेचे स्थापना करण्यात आली, कारण भारताला ब्रिटिशांच्या शोषणातून कायमचे मुक्त करायचे होते. शेतकरी, कामगार, मजूर या सर्वांचे शोषण करणारी अन्यायी यंत्रणा उलटून टाकायची होती. वेगवेगळे शस्त्र गोळा करणे, महत्त्वाच्या कार्यक्रमाचे अंमलबजावणी करणे ही कामे स्वतंत्र एका संघटने कडे देण्यात आली तिचे नाव होते.हिंदुस्तान सोशॉलिस्ट रिपब्लिकन आर्मी आणि त्या विभागाचे प्रमुख चंद्रशेखर आझाद होते, सरकारने या विभागावर धाडी टाकल्या. राजद्रोहाच्या आरोपाखाली अनेक खटले भरण्यात आले. वीर भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांना 23 मार्च 1931 रोजी लाहोरच्या तुरुंगात फाशी देण्यात आली. चंद्रशेखर आझाद मात्र इंग्रज अधिकाऱ्यांना सळो की पळो करून सोडले, शेवटपर्यंत ते इंग्रजांच्या हाती लागले नाहीत. फितुरी हा भारतीय समाजाला लागलेला एक कलंक आहे. या फितूरीनेच अनेकांचा जीव घेतला हेच शस्त्र वापरून इंग्रजांनी चंद्रशेखर आझादानाही घेरले. शेवटी अलाहाबादच्या अल्फ्रेड पार्कमध्ये पोलिसांशी चकमक झाली, तेव्हा त्यांनी अनेकांना जखमी करून, मै आझाद था. आझाद हुँ, आझाद ही रहूँगा असे म्हणून आपल्या बहारदार मिशीला पीळ देऊन स्वतः च्या अंगावर गोळी झाडून घेऊन आपली शपथ पूर्ण केली. या भूमीत घडलेल्या सर्व क्रांती मधील नररत्नाची नुसती ओळख जरी करून घ्यावयाचे असेल तर आपल्याला हजारो पानाचे अनेक पुस्तके लिहावे लागतील म्हणून आपण फक्त या लेखाच्या रूपाने त्यांच्या कार्यकर्तृत्वाची थोडक्यात ओळख करून घेत आहोत. इंग्रज सत्ते विरुद्ध झुंजत असताना ज्यांनी आपल्या प्राणाचे मोल मातृभूमीच्या चरणी अर्पण केले .अशा नरत्नाच्या चारित्र्यातून आणि चरित्रातून आजच्या तरुणांनी स्फूर्ती घेऊन त्यांच्या कार्याचा अभ्यास करावा इतकेच नाही तर जगाला उलगडून दाखवावे. आपण स्वंतत्र आहोत याची माहिती आपणास आहे परंतु परकीयांचे येथे प्रस्थ दिवसें दिवस वाढत आहे हे जर असे वाढत राहिले तर पुन्हा आपल्या देशावर कोणते संकट ओढावेल हे सांगता येणार नाही; त्यासाठी आजच्या तरुणांनी स्वाभिमानी बनावे, आपला काही वेळ देशसेवेसाठी घालवावा. तसेच आपले विचार हे राष्ट्रप्रेमी असावेत. तेव्हाच त्यांना खरोखर आदरांजली ठरेल. स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात त्यांनी समर्पण केलेल्या त्यांच्या स्वतःच्या देहाच्या, संसाराच्या, सुखाच्या आणि सर्वस्वाचा त्यांनी त्याग केला. जिवंतपणे ब्रिटिश सरकारच्या हाती पडणार नाही ही प्रतिज्ञा त्यांनी पूर्ण केली 27 फेब्रुवारी 1931 रोजी ते शहीद झाले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर या क्रांतिकारकांचा यथोचित सन्मान होण्यासाठी भारत सरकारने अलाहाबाद येथील मैदानाला चंद्रशेखर आझाद मैदान असे नामकरण केले. जयंतीनिमित्त त्यांना शतश :प्रणाम

# नियतकालिकांचे प्रश्न, भूमिका आणि वाचकांची मानसिकता

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : २५

वर्तमान काळ झपाट्याने पुढे पुढे सरकतो आहे. सामाजिक बदलांसह सांस्कृतिक आणि राजकीय घडामोडींची शृंखला सातत्याने सुरू आहे. जनतेसमोर जगण्यासाठीचे अनेक प्रश्न 'आ' वासून उभे आहेत. राजकीय पक्षांसमोर स्वतःचा पक्ष आणि कार्यकर्ते टिकवून ठेवण्याचे प्रश्न आहेत, त्यासोबतच सत्ता टिकवून ठेवण्याचे प्रश्न आहेत. याहीसोबत स्वतःचे चारित्र्य टिकवून ठेवण्याचा मोठा प्रश्न आहे.

आजच्या अशा गदारोळाच्या परिस्थितीत सामान्य माणसापासून ते राजकीय मंडळीपर्यंत स्वतःच्या चारित्र्याचा विचार केला जातो. स्वतःला निर्मळ, निर्मोही सिद्ध करण्यास अनेक माध्यमाचा वापर केला जातो. मग ते दैनिक असो, साप्ताहिक असो, पाक्षिक असो....नियतकालिक असो अनियतकालिक असो... कोणतेही प्रसारमाध्यमे असोत आपली प्रतिष्ठा व आपले चारित्र्य जपण्याचा प्रयत्न केला जात असतो. अलिकडच्या काळात प्रसारमाध्यमे त्यातही इलेक्ट्रॉनिक मिडीया जास्त करून राजकीय घडामोडींच्या बातम्यांना प्राधान्य देतात यातून प्रिंट मिडियाची नियतकालिके व अनियतकालिकेही सुटली नाहीत. हे आपण अनुभवतो आहोतच. बरीचशी वृत्तपत्रे ही पक्षाच्या मालकीची आहेत म्हणून ते आपापल्या राजकीय पक्षाचा कैवार घेऊन लिहीत असतात... त्यांना जनतेच्या प्रश्नांशी तितकेसे देणे घेणे नसते.

इलेक्ट्रॉनिक मिडीयाने तर प्रिंट मिडियावर घावच घातला आहे. दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, नियतकालिके, अनियतकालिके ही प्रसारमाध्यमे आज संकटात आहेत. त्यांच्यासमोर आर्थिक संकट हे एकच कारण नसून वाचकांचा प्रश्न निर्माण झालेला आहे. लेखकांचा प्रश्न निर्माण झालेला आहे. जनतेला नेमके काय वाचावयास द्यावे हाही प्रश्न निर्माण झालेला आहे. कारण वाचकांची अभिरुची बदललेली आहे. वाचकांना नेमके काय लागते याचाही सुगावा घेणे गरजेचे झाले आहे. नियतकालिके चालविण्यासाठी नेमकी कोणती भूमिका घेतली पाहिजे.. याच अनुषंगाने आमचे मित्र 'द पीपल्स पोस्ट' चे संपादक चेतन शिंदे यांनी औरंगाबाद येथील समर्थ नगरात असलेल्या गांधी भवनात एका बैठकीचे आयोजन केले होते. त्या बैठकीला अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. त्यामध्ये ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत, साहित्यिक, सकाळचे माजी संपादक मा. उत्तम कांबळे सर, ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत मा.डॉ. प्रल्हाद लुलेकर सर, ज्येष्ठ लेखक, सामाजिक कार्यकर्ते एच.एम.देसरडा सर, आंबेडकरी साहित्याचे अभ्यासक,मा. डॉ.संजय मून सर, ज्येष्ठ समाजसेवक कॉम्रेड अण्णा सावंत, कम्युनिस्ट चळवळीचे ज्येष्ठ कार्यकर्ते, संपादक मा.भीमराव बनसोड, ज्येष्ठ साहित्यिक मा.शेषराव चव्हाण सर माहिती व जनसंपर्क निवृत्त अधिकारी मा.यशवंत भंडारे सर, लेखक डॉ.भीमराव सरवदे, लेखक ॲड. अभय टाकसाळ, पत्रकार निकाळजे, लेखक मित्र सुदाम मगर, संपादक चेतन शिंदे, मी स्वतः आणि अजून दोन चार सबंधित मान्यवर त्यांची नावे आठवत नाहीत. अरुण येंडे व पत्रकार प्रतिक कुकडे यांनी पाठविलेल्या निमंत्रणावरून या बैठकीस मुद्दाम उपस्थित होतो. या मान्यवरांसोबत चर्चेत सहभागी होता आले. सर्वच मान्यवरांचा साहित्य आणि पत्रकारितेतला प्रदीर्घ अनुभव असल्याने ही चर्चा रंगली...काही मान्यवरांनी स्वानुभूतीचे प्रसंगही कथन केले.

दैनिके, साप्ताहिके याहीपेक्षा पाक्षिके व मासिकांचे प्रश्न अतिशय गंभीर आहेत. अनियतकालिकांचे प्रश्न तर त्याहूनही अधिक जिकिरीचे आहेत. मात्र वृत्तपत्रांची संख्या अधिकच वाढू लागली आहे, का वाढू लागली आहे ? हाही प्रश्न कोड्यात टाकणारा आहे.. याचे मुळाशी जाण्याअगोदर वृत्तपत्रांची स्थिती, पत्रकारितेचा दर्जा, संपादकांची मानसिकता, आर्थिक तरतूदीची चिंता, काही वार्ताहरांना बातम्याच लिहीता येत नाहीत, म्हणून कॉपी पेस्ट किंवा पेड न्यूज पत्रकारितेचा वाढलेला प्रकार, किंवा



बातमी टाईप करण्यासाठी वेळ नाही, माणसे नाहीत, संपादकावर याचा पडलेला भार.. अशा अनेक समस्या विद्यमान पत्रकारितेचे दुखणे होऊन बसले आहे...यावर काय उपाय करावे लागतील याबाबत अनेक दिग्गज संपादक विचारात पडलेले आहेत.

पत्रकारितेच्या विद्यमान परिस्थितीला सामोरे जातांना कोणत्याही तटस्थ भूमिकेतून ह्या प्रश्नांची उकल होणारी नाही... उलट दिवसेंदिवस पत्रकारितेच्या क्षेत्रात निर्माण होणाऱ्या नवनवीन आवाहनाचा स्वीकारच करावा लागणार आहे, वाचक मेळाव्याचेही वरचेवर आयोजन केले जावे असा या चर्चेतला सूर होता.

सध्या पत्रकारितेत समाजमाध्यमांतून येणाऱ्या मजकुराचाही उपयोग होत आहे. वृत्तपत्रांत छापून येण्याअगोदरच सोशल मीडियावर काही सेकंदात बातमी हजारो लोकांपर्यंत जाऊन पोहचते. इलेक्ट्रॉनिक मिडीयासुद्धा याबाबत अत्यंत तत्परतेने काम करतो आहे. इलेक्ट्रॉनिक मिडीयावर रात्री आलेली बातमी सकाळी वृत्तपत्रांत येते; परंतु इलेक्ट्रॉनिक मिडीया ठळक ठळक बातम्यांनाच प्राधान्य देतो. त्याद्वारे ग्रामीण भागातील शोषितांच्या, शेतकऱ्यांच्या, उपेक्षितांच्या, गोरगरिबांच्या व्यथा-वेदनांना वाचा फोडली जात नाही. हे काम फक्त वृत्तपत्रेच करू शकतात; परंतु त्यांचे संपादक मालक आर्थिकदृष्टया सक्षम नसतात म्हणून वृत्तपत्रांची अवस्था सध्यातरी 'इकडे आड तिकडे विहीर' अशी झाली आहे. एकतर वृत्तपत्र बंद पाडता येणार नाही आणि ते सुरू ठेवण्यासाठी कुठले आर्थिक मार्ग अवलंबवावेत हा प्रश्न सतावणारा आहे.

पत्रकारितेत खोट्या पत्रकारांना प्राधान्य दिले जात आहे. धर्मदाय आयुक्त यांचेकडे सोसायटी व ट्रस्ट ॲक्ट अंतर्गत नोंदणी असलेल्या सेवाभावी संस्थांना, पत्रकार संघटना गृहित धरून अधिस्वीकृती समित्यांवर नियुक्त्या दिल्या गेल्या. न्यास नोंदणीचा व संघटना नोंदणीचा स्वतंत्र कायदा विभाग असताना माहिती आणि जनसंपर्क विभागाने थेट पत्रकारांच्या सेवाभावी संस्थांनाच संघटना असे गृहित धरले आहे. १९सप्टेंबर २००७ रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीवर एकूण २७ व ९ विभागीय समित्यांवर ४५ सदस्यांना नियुक्त केले जाते. या खोट्या नियुक्त्याबाबत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मा.वसंत मुंडे यांनी या प्रकाराबाबत लढा उभारलेला आहे.

थोडक्यात सांगायचे म्हणजे पत्रकारिता क्षेत्रात गैरप्रकाराचीही वाढ होत आहे. हाडाचे पत्रकारांना डावलून नवशिक्यांना प्राधान्य दिले जाणे ही शोकांतिकाच आहे.
....जनता तर आता वृत्तपत्रांमध्ये छापून येण्याची वाट पाहत बसत नाही. समाजमाध्यमांद्वारे आपल्या बातम्या लगेच प्रसिद्ध करतात. छोट्या मोठ्या समस्यांना चव्हाट्यावर आणण्यासाठी समाजमाध्यमावर लोक लिहीत आहेत.. अगदी साहित्याचे सर्व लेखनप्रकार इथे टाकले जात आहेत. लेखासारखा दीर्घ लेखनाचा प्रकारही लेखक मंडळी लिहून टाकत आहे. दीर्घ मजकूर लिहिणाऱ्यांमध्ये अनेक मान्यवरांचाही समावेश आहे. वॉट्सॲप, फेसबुक, इन्स्टाग्राम, ब्लॉग अशा काही हक्काच्या माध्यमांचा वापर करून आपली मते, मांडण्यासाठी समाजमाध्यम हे वृत्तपत्रांना पर्याय ठरले असल्याने वृत्तपत्रे अडचणीत सापडली आहेत.

वृत्तपत्रांद्वारे काही काळ काहींनी व्यवसायही केला आजही काही लोक वृत्तपत्रांकडे व्यवसाय म्हणूनच पाहतात, मात्र वृत्तपत्रांची परिस्थिती सध्या गंभीर आहे, नियतकालिकांची तर अतिशय गंभीर आहे, तरीही या सर्वांना तोंड देत अनेक संपादक बांधव प्रतिष्ठेसाठी किंवा बंद पडल्यावर होणाऱ्या अपमानास्पद जगण्याचा विचार करत आपली वृत्तपत्रांची जबाबदारी पार पाडत आहेत. त्यांच्या धाडसासाठी मनस्वी शुभेच्छा..!

# पत्र निर्भयाचे !



नागेश सू. शेवाळकर
९४२३१३९०७१

आधुनिक केसरी

**नीच दुष्कृत्य करणारांनो, यापेक्षा दुसरी उपमाच सूचत नाही रे तुमच्यासाठी! मी एक निर्बल निर्भया! गल्लीपासून दिल्लीपर्यंत कुठेही तुम्हा लांडग्यांच्या तावडीत सापडणारी, तुमच्या अत्याचाराला, वासनेला बळी पडणारी, विकृत चाळे सहन करणारी ! जशी मी कुठेही असते, कुठेही तुम्हाला सहजासहजी सापडू शकते तसेच वासनांधानो तुमचाही वावर सर्वत्र असतो. तुमची सावध, शोधक नजर एखाद्या पाखराला, सावजाला शोधत असते. तुमचे सुदैव आणि आम्हा निष्पाप निर्भयांचे दुर्दैव असे की, मनी वसे ते समोर दिसे याप्रमाणे आम्ही तुमच्या तावडीत सापडतो. भुकेल्या वाघाने एखाद्या शेळीवर तुटून पडावे तसे तुम्ही आम्हा निर्भयांवर तुटून पडता. तुम्हाला स्थळ, वेळ, काळ यापैकी कशाचेही भान राहात नाही.**

आपले नीच काम कुणी बघतंय यालाही तुमच्या लेखी शून्य किंमत असते. कारण तेव्हा तुम्ही वासनेची नशा, मस्तीचा कैफ, मुजोरीचा मोद चढून आंधळे झालेला असता. तुम्हाला दिसते फक्त निष्पाप, कोवळी निर्भया! दिसते तिचे शरीर! तिला होणाऱ्या यातना, त्रास, तिची भिरभिरती- याचनामयी नजर पाहून तुमची 'वासनामेल' तुफान धावत सुटते. मला एक प्रश्न पडतो की, असे का तुमचे आचार-विचार ? तुमच्या आई-वडिलांची हिच का शिकवण ? हेच सांगतोय का तुमचा धर्म ? हिच का आपल्या देशाची संस्कृती ? जर असे असेल तर मग तुमच्या बहिणीकडे, मैत्रिणीकडे, नात्यातील कुण्या मुलीकडे दुसऱ्या कुणी त्याच नजरेने पाहिले तर का तुमच्या डोळ्यात अंगार फुलतो ? त्याचे डोळे फोडण्यासाठी आणि हायपाय तोडण्यासाठी तुमचे हात का शिवशिवतात ?नरडीचा घोट घेण्यासाठी का तुम्ही त्याच्यावर धावून जाता ? दुसरीकडे एखादी निर्भया समोर येताच तुमच्या डोळ्यात फुललेला अंगार वासनेत का बदलतो ? तुमचे डोळे आणि आचरण अचानक का हिंस्र होते ? समोर जी निष्पाप बालिका दिसतेय ती ही कुणाची तरी मुलगी असेल, बहीण असेल, मैत्रीण-बायको असेल हा विचार तुमच्या डोक्यात का येत नाही ? आपण जे राक्षसी कृत्य करणार आहोत, करीत आहोत तसेच कृत्य दुसरा एखादा नराधम आपल्या जवळच्या, नात्यातील मुलीसोबत करू शकतो हे का तुमच्या डोक्यात शिरत नाही ? वासना आंधळी असते हे ऐकलं होतं पण, ती कुणाच्या जीवावर उठणारी, कुणाचा संसार उद्ध्वस्त करणारी असू शकते हे आम्हाला माहिती नव्हते. आश्चर्य याचे वाटते की, घरी सुंदर, सौंदर्यवती, रती पत्नी असूनही तुम्ही का अतिरिक्त वासनेसाठी हपापलेले असता ? अशा प्रकारची दुर्वासना, अतिरिक्त वासना तुमच्या मनात येते कशी ? सान्निध्यात आलेल्या युवतीला केवळ शारीरिकच नव्हे तर मानसिक इजा करणारी, तिला जीवनातून उठवणाऱ्या राक्षसी वासनेचा उगम होतो कुठून ? ती बिचारी हात जोडते, तुमच्या पाया पडते, विनवणी करते, गयावया करते, तुम्हाला शरण येते परंतु, तुमच्या हवशीपणामध्ये काहीही फरक पडत नाही. उलट तिचे दौर्बल्य, तिचा हताशपणा, तिचे आर्जव पाहून तुम्हाला तिची दया येत नाही, तर तुमचा खुनशीपणा जास्त वाढतो. दुप्पट जोमाने तुम्ही तिला जखमी करता, तिच्या शरीराचे लचके तोडता. हे दुष्टचक्र कधी थांबणार आहे ?

तुमच्या राक्षसी कामांना कुणी शिक्षा केली नाही असेही नाही. जाणीव जिवंत असणाऱ्या समाजाने अनेकांना शिक्षा केली तर कधी काही नराधम कायदेशीर चौकटीत शिक्षेला पात्र ठरले परंतु, तरीही तुमच्यासारख्या लांडग्यांचे डोळे उघडत नाहीत. एखादी निर्भया दिसली की, तुमच्या वासनेला भरती येते. तुमच्या शरीरात हिंसकता भरभरून अवतरते. शेवटी जे व्हायचे तेच होते, एक निर्भया कलंकित होते, प्रसंगी तिचा बळी जातो किंवा मग ती समाजापासून स्वतःला लपवत जीवन जगते, नाही तर मग तसेच रक्ताळलेले, विटाळलेले शरीर घेऊन स्वतःच स्वतःला संपवून टाकते. समाजातील काही तथाकथित शहाणे म्हणवून घेणारे तज्ज्ञ आमचे वागणे, राहणे, बोलणे, चालणे आणि विशेषतः आमच्या पोशाखामुळेच वासनांध बलात्कार करण्यासाठी प्रोत्साहित होतात अशी मल्लिनाथी करून मोकळे होतात. खरे तर ही पळवाट आहे, स्वतःचे षंढत्व लपविण्यासाठी केलेली केविलवाणी धडपड आहे. युगानुयुगे आम्ही 'काकुबाईच' बनून राहायचे का ? आमच्या 'आखूड' वस्त्रांचा दोष आमच्या माथी मारतांना हे पळपुटे हे का विसरतात की, अगदी सोज्वळ असणाऱ्या, अंगभर कपडे घालून वावरणाऱ्या महिलांवर बलात्कार झाले नाहीत ? आज होत नाहीत ? या वासनांधांना हवे असते फक्त शरीर... मग ते सात वर्षाच्या कोवळ्या बालिकेचे असो की साठी ओलांडलेल्या महिलेचे असो. आम्ही स्वतंत्र राहायचे नाही का ? मुक्तपणे वावरायचे नाही का ? देशाला खरेच स्वातंत्र्य मिळाले आहे का ? कायम घुसमट सहन करून, नजर खाली ठेवून, परंपरागत पोशाख करुनच राहायचे का ? बदलायला हवी पुरुषांची वासनांकित नजर, बदलायला हवे मानवी किळसवाणे वर्तन. स्त्रीवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात मूग गिळून बसण्याचा स्वभाव बदलायला हवा. वासनेच्या खेळात कलंकित होणाऱ्या स्त्रीचाच बळी जाणार ही परंपरागत धारणा बदलायला हवी.




आम्हा निर्भयांना तुमच्यासारख्या गुंडांचे आश्चर्य वाटत नाही तर नवल वाटते ते या प्रगत समाजाचे! एखाद्या सार्वजनिक ठिकाणी एखादा गुंड एखाद्या निष्पाप बालिकेला सतावत असताना, तिच्यावर अत्याचार करत असताना तिथे असणारे लोक शांत कसे बसू शकतात ? त्यांच्या माना का खाली जातात ? हातपाय का निष्प्राण होतात ? काही लोक उघड्या डोळ्यांनी ते सारे पाहात असताना त्यांच्या डोळ्यात संताप नसतो तर अनेकांच्या डोळ्यात त्या तरुणीचे शरीर पाहण्याची लालसा असते. तिथे उपस्थित असणारी माणसावळ एवढी निर्लज्ज, बेशरम असते की, काही जण समोर घडणाऱ्या घटनेतील धिंडवडे निघणाऱ्या तरूणीच्या शरीराचे स्वतःच्या भ्रमणध्वनीवर चित्रीकरण करण्यात धन्यता मानतात. भावना एवढ्या बोथट, संवेदनाहीन झालेल्या आहेत का ? बंद दाराच्या आड अन्यायाविरुद्ध लढण्याची भाषा करणारे, गुंडगिरी खूप माजलीय हे ओरडून सांगणारे लोक, पोलीस आणि सरकारला दोष देणारी मंडळी प्रत्यक्ष घटना घडताना का पुढे येऊन ते सारे थांबवण्याचा, त्या नराधमाला पकडून पोलिसांच्या हवाली करण्याची हिंमत का दाखवत नाहीत ? सार्वजनिक ठिकाणी घडणाऱ्या घटनास्थळी नराधम बोटावर मोजता येतील अशा संख्येने असतात. दुसरीकडे बघे मात्र शेकड्यांनी असतात. बघ्याच्या झुंडीने ठरविले तर एका क्षणात त्या बदमाशांना त्या प्रकारापासून रोखू शकतात. परंतु, बघे संघटित नसतात. अत्याचार सहन करणारी तरुणी त्यांची कुणीच नसते. महत्त्वाचे म्हणजे जिथे सामाजिक प्रश्न निर्माण होतो तिथे लोक कुणी तरी पुढे येईल याची वाट बघत बसतात. 'पहले आप...पहले आप' ही धारणा बळावलेली असते. गर्दीला कोणताही चेहरा नसतो, कोणत्याही भावना नसतात हेच खरे. उलट एक प्रकारची भीती मनामध्ये घर करून असते. त्यामुळे त्या तरुणीला त्या गुंडापासून वाचविण्यासाठी कुणीही पुढे येत नाही. गर्दीच्या याच मानसिकतेचा फायदा घेऊन बदमाश अधिक अमानुषपणे हल्ला चढवतात. परवा मात्र एका तरुणाने कोयत्याने हल्ला करणाऱ्या एका गुंडापासून एका तरुणीला वाचवले. या तरुणाचे अनुकरण करणारी तरुणाई पुढे यायला हवी.

गर्दीतील मानवांची दुसरी गमतीदार मानसिकता अशी असते की, ज्या घटनेचे लोक साक्षीदार असतात, ती घटना घडून गेल्यानंतर त्या कोवळ्या तरुणीवर अनन्वित अत्याचार करून गुंड तिथून निघून जाताच त्या झुंडीतील एक-एक जण शेर बनतो. पुढे येऊन पोलीस-सरकार यांच्यावर ताशेरे ओढत सुटतो. त्या घटनेच्या , त्या गुंडांच्या विरोधात जेव्हा मोर्चा निघतो, उपोषण-धरणे देण्याचा कार्यक्रम होतो तेव्हा हिच बघे मंडळी मोठ्या हिरिरीने भाग घेतात. पोटतिडकीने भाषण देतात. घसा बसेपर्यंत घोषणा देऊन आसमंत दणाणून सोडतात. कारण त्यावेळी त्यांच्या अवतीभवती असते पोलिसांचे कवच! घटना घडताना सशाच्या काळजाने ते सारे पाहताना पोलीस समोर येताच अचानक त्यांच्यातील सिंह जागा होतो. डरकाळ्या फोडू लागतो. उबग आलाय घटनेनंतर घडणाऱ्या तोंडदेखल्या उपचारांचा! मेणबत्त्या लावून निषेध काय हा प्रकार! माझ्या फोटोभोवती मेणबत्त्या लावून संवेदना प्रकट करताना आमच्या शरीराचाही विचार करा. नराधमांनी जखमी केलेल्या शरीराभोवती पेटलेल्या असंख्य मेणबत्त्या आमच्या जखमांना जणू चटके देतात. शरीराची लाही लाही होतेय. हिंमत असेल तर करा त्याच मेणबत्त्यांची चिता आणि नराधमांना पकडून फेका त्या चितेवर! कराल एवढे ? हे नराधमांनो, थांबवा आता सारे. लुटू द्या आम्हालाही मनमोकळा आनंद! हेही लक्षात घ्या की, आजची निर्भया बदलत आहे. शिक्षणासोबत ती संरक्षणाचे धडे घेत आहे. असेल अशा निर्भयांची संख्या कमी परंतु, बदल होताना, तो स्वीकारताना निश्चितच वेळ लागतो. मात्र, हे बदल जेव्हा घडून येतात तेव्हा एक क्रांती घडते. अशी क्रांती जशी देशाला स्वातंत्र्य मिळवून देते तशीच ती निर्भयांनाही स्वातंत्र्य मिळवून देईन... निश्चितच स्वातंत्र्य मिळवून देईल.तुझीच, तुझ्याच अत्याचाराला बळी पडलेली, एक निर्भया....

# मणिपूरच्या 'त्या' महिलांसाठी बोला

आधुनिक केसरी

**सर्व भारतीय प्रेक्षक आणि वाचक, शक्य आहे की आपल्यापैकी अनेकांनी मणिपूरचा तो व्हिडीओ पाहिला नसेल,ज्यात खूप सारे पुरुष काही महिलांना नग्न करून तिचं शरीर दाबत आहेत. पुरुषांचा जमाव निर्वस्त्र केलेल्या महिलांना पकडून घेऊन जात आहे. जमावाचे खुनी हात त्या महिलांच्या शरीरासोबत खेळत आहेत. असहाय्य आणि लाचार महिला रडताहेत. पुरुषांची गर्दी आनंद घेत आहे.**
**सभ्यतेच्या सामाजिक नियमांनुसार सोशल मीडिया साईट्स लवकरच या व्हिडीओचे प्रदर्शन थांबवतील. परंतु घडलेली घटना वास्तव आहे. घटनेचे तपशील तेच आहेत जे लिहिले आहेत.आपल्याला माहीत नाही की या व्हिडीओ नंतर त्या महिलांच्या सोबत काय झालं? जमावाची गर्दी त्यांना कुठून घेऊन येत होती? कुठे घेऊन जात होती? त्या व्हिडीओला सुरवात आणि शेवट नाहीये,फक्त मधला थोडा भाग आहे. कोणीही त्या व्हिडीओ कडे दुर्लक्ष करू शकत नाही. आज तुम्ही शांत राहू शकत नाही.**

पुरुषांच्या जमावाने वेढलेल्या त्या निर्वस्त्र महिलांसाठी आज बोलावं लागेल. तुम्ही जिथे कुठेही असाल,बोला. बाजारात गेलात तर तिथे दुकानदाराशी बोला. रिक्षावाल्याशी बोला. ओला उबर कॅबच्या ड्रायव्हरशी बोला. वडिलांना फोन केला तर त्यांना सगळ्यात आधी हे सांगा. प्रेयसीचा फोन आला तर सगळ्यात आधी हे सांगा. वर्गात असाल तर उभं राहून तुमच्या शिक्षकांशी बोला. कोणत्या रेस्टॉरंट मध्ये मित्र मैत्रिणींसोबत मस्ती करत असाल तर खाणं थांबवून या महिलांसाठी बोला. बसमध्ये असाल, रेल्वेत असाल,विमानतळावर असाल तर तिथे सांगा की मणिपूर मध्ये असा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे, ज्यात जमाव महिलांना निर्वस्त्र करून त्यांच्या शरीराशी खेळत आहे. ही घटना अशा देशात घडली आहे जिथे 'आमच्या इथे महिलांना देवी समान वागणूक देऊन तिची पूजा केली जाते.' हे खोटं वारंवार पसरवलं जातं.

आज जर या जमावाच्या विरोधात तुम्ही बोलला नाहीत तर त्या महिलांचं शरीर आणि मन नेहमी करता नागडं होईल. तुमचं न बोलणं, याचा अर्थ तुम्ही त्या गर्दीत सामील होणं आहे. तुमचं बोलण्याने तुम्ही महिलांना नग्न करून त्यांच्या शरीराशी खेळणाऱ्या पशूंच्या जमावात सामील होता. म्हणून फोन उचला, लिहा, सर्वांना सांगा की मणिपूरच्या महिलांच्या सोबत असं झालं. आम्ही याचा विरोध करतो.आमची मान शरमेने खाली जाते. मणिपूर मधील घटनेच्या विरोधात बोला.कोणी ऐकत नसेल तर बंद खोलीत त्या महिलांसाठी एकट्याने रडून घ्या.

मला माहितीये की मणिपूर मधील त्या महिलांची असहाय्यता आणि लाचारी तुमच्या पर्यंत पोहचणार नाही, कारण तुम्ही त्यांची हाक ऐकण्याच्या लायक राहिलेले नाही आहात. तुम्ही जे वर्तमानपत्र वाचता,जे चॅनेल पाहता, त्यांनी तुमची संवेदनशीलता मारून टाकली आहे. तुमच्या आतला चांगुलपणा त्यांनी संपवून टाकला आहे.

गोदी मीडिया मध्ये त्या महिलांचा आवाज उठेल की नाही मला माहित नाही. मला नाही माहीत की हे दृश्य पाहून आपले पंतप्रधान विव्हळ होऊन रडतील किंवा नाही ? मला नाही माहीत की महिला विकास मंत्री स्मृती इराणी दिखाव्यासाठी तरी का होईना पण रडतील किंवा नाही ? पण मला हे माहीत आहे की हा जमाव कोणी बनवला आहे. कोणत्या प्रकारच्या



राजकारणाने बनवला आहे. या राजकारणाने तुम्हाला पशु बनवलं आहे.गोदी मीडिया ने त्यांच्या प्रेक्षक आणि वाचकांना माणूसघाणं बनवलं आहे.

जात, धर्म, भाषा, प्रदेशाच्या अस्मितेच्या राजकारणाने माणसालाच माणुसघानं बनवलं आहे. मणिपूरच्या महिलांना घेरून नाचणारा पुरुषांचा जमाव तुमच्या आजूबाजूला सुद्धा तयार झाला आहे. सोसायटीतील काका लोकांपासून सावधान रहा. आपल्या घरात दिवस रात्र विष पेरणाऱ्या नातेवाईकांपासून सावधान रहा. त्या सर्वांना जाऊन सांगा की की अस्मिता आणि द्वेषाच्या राजकारणाने देशाच्या जनतेला कशाप्रकारे या जमावात सामील केलं आहे. त्या 'मणिपूर'च्या महिला नाहीयेत.त्या कुकी महिला नाहीयेत. त्या फक्त महिला आहेत. जर ही घटना तुम्हाला अस्वस्थ करत नसेल, याने तुमचं शरीर कंप पावत नसेल तर तुम्ही स्वतःला मृत घोषित करून टाका.

पण शेवटचा श्वास घेण्यापूर्वी त्या महिलांसाठी बोलून टाका. लिहून टाका. कोणाला तरी सांगा की असं झालं आहे. या देशाच्या पंतप्रधानांनी मणिपूर मध्ये सुरू असलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर गेल्या अडीच महिन्यात शांततेचे आवाहन केलेलं नाही. तिथे जाऊन द्वेष आणि हिंसा रोखण्याचे आवाहन केलेलं नाही. सरकारने त्याचं कर्तव्य पार पाडलं नाही. त्यांच्या जाण्याने किंवा आवाहनाने हिंसा थांबलीच असती याची काही गॅरंटी नाही. पण या चुप्पीचा काय अर्थ आहे ? या चुप्पीचं समर्थन केलं जाऊ शकतं ?

पंतप्रधानांची चुप्पी असू द्या.
तुम्ही तुमची चुप्पी तोडा.
बोला.

**तुमचा,**
**रविष कुमार.**
**मराठी भाषांतर : कृतार्थ शेवगावकर**
**-20 जुलै 2023.**



# डॉ. आंबेडकर यांच्या विचारातून स्त्री सशक्तीकरण

अनिल ओहळ
9404283667

आधुनिक केसरी

**आपल्या भारत देशातील स्त्रीयांवर भारतरत्न, दलितांचे कैवारी ,बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अनंत उपकार आहेत.स्त्रियांना आपले हक्क मिळावे यासाठी त्यांनी खूप मोलाची कामगिरी केली. बाबासाहेब आंबेडकरांनी फक्त दलित स्त्रियांचा विचार केला नाही तर समस्त स्त्रीवर्गाचे प्रश्न ऐरणीवर आणले नी तत्कालीन सरकारपुढे त्यांच्या हक्काच्या संदर्भात व्यथा मांडून अहोरात्र अभ्यास करून न्यायिक चळवळ उभी केली. त्याचा लाभ समस्त शोषित ,पीडित,दलित , अस्पृश्य व वंचित घटकांच्या कुटुंबातील स्त्रीवर्गाला झाला. भारतात लोकशाही अमलात आली असली तरी मतदान प्रकियेत महिलांना समान संधी मिळावी.**

त्यांना राजकारण किंवा सामाजिक क्षेत्रातही काम करण्याची संधी मिळावी हा विचार बाबासाहेब



आंबेडकर यांच्या डोक्यात केव्हाच आला होता. आपणास ज्ञात असेल ज्या मतदानाच्या अधिकारासाठी युरोपमधल्या स्त्रियांना संघर्ष करावा लागला तो मतदानाचा अधिकार भारतीय स्त्रियांना न मागताच मिळाला याचे संपूर्ण श्रेय डॉ.भीमराव आंबेडकर यांना जाते. कुटुंब व त्याचे नियोजन यांची जवळीक स्त्रियांशीच असल्याची भूमिका मांडली. ज्या ज्या वेळेस बाबासाहेब आंबेडकर चळवळ उभी करत त्या त्या वेळेस बाबासाहेबांनी आपल्या चळवळीत स्त्रियांना आवर्जून सहभागी करून घेतले. तत्कालीन 1927 च्या महाडच्या ऐतिहासिक चवदार तळ्याच्या सत्याग्रहात स्त्रियांचा सहभाग लक्षणीय असा होता..1942 च्या नागपुरातील महिला परिषदेत भारतीय स्त्रिया यांची उपस्थिती लक्षणीय होती. पूर्वी मुलींचे लग्न झाले म्हणजे घरात हक्काचा गुलाम आला अशी काहीशी वृत्ती काही घरात बोकाळली होती. आणि त्यामुळे तिच्याकडे क्षमता असतानाही तिला शिक्षण पूर्ण करण्यासाठी फार अडथळे येत होते. लग्न ही मुलींच्या प्रगतीच्या वाटेतला फार मोठा अडसर होता. त्याकाळी भारतीय समाजात स्त्री पुरुष विषमता फार वाढीस लागली होती. भारतीय समाज व्यवस्थेत घट्ट रुजलेली लिंगावर आधारित विषमता नष्ट करणाऱ्या बाबासाहेबांना स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार स्वस्थ बसू देत नव्हते.स्वतंत्र भारताचे पहिले मजूर मंत्री म्हणून बाबासाहेबांनी स्त्रियांच्या सक्षमीकरण करण्यासाठी अनेक हिताचे निर्णय घेऊन त्या कायद्याची सक्तीने अंमलबजावणी केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या माध्यमातून स्त्रियांना जे अधिकार दिलेत त्यामुळे विसाव्या शतकाच्या शेवटच्या टप्प्यात स्त्रियांनी ज्या ज्या चळवळी उभ्या केल्यात ,वेगवेगळ्या क्षेत्रात स्त्रियांनी जे प्राविण्य मिळविले आणि सामाजिक भूमिकेत मानाचे स्थान मिळविले त्या सगळ्यांचे अधिष्ठान म्हणजे बाबासाहेबानी लिहिलेली राज्यघटना होय. 25 डिसेंबर 1927 रोजी आंबेडकरांनी एक अभिनव क्रांति केली. "मनुस्मृती" नावाचा अन्याय करणाऱ्या ग्रंथाचे सामूहिक दहन केले. या कृतीने क्षुद्र व स्त्रियांमध्ये फार मोठा आत्मविश्वास जागृत झाला. दलितांच्या चळवळीत आपोआपच मोठ्या संख्येने कष्ट्करी दलित, वंचित ,पीडित, आणि अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या स्त्रिया सहभागी होऊ लागल्या. स्त्रियांनी निर्भयपणे जगायला शिकले पाहिजे .मुलींना आपला आयुष्याचा जोडीदार आपल्या पसंतीने निवडण्यात यावा असे मत त्यांनी व्यक्त केले. दरिद्री माणसे आणि स्त्रिया यांना संततीनियमन हे वरदान आहे असे त्यांना वाटत होते. खाण कामगार स्त्रीला प्रसूती भत्ता , कोळसा खाणीत पुरुषांच्या बरोबरीने काम करणाऱ्या स्त्रीला पुरुषाइतकीच मजुरी ,बहुपत्नीत्वांच्या प्रथेला पायबंद ,मजूर व कातकरी स्त्रियांना समान वेतन देण्याचा त्यांनी हट्ट धरला. स्त्रियांचे त्यांच्या मनाविरुद्ध झालेले विवाह आणि वारंवार जाणूनबुजून लादली जाणारी बाळंतपणे हे पितृसत्ताक पध्दतीमुळे होत होते. ही सामाजिक परिस्थिती जर बदलायची असेल तर त्यासाठी स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे. हा विचार त्यांनी आपल्या लेखनातून पोट तिडकीने मांडला. प्रा. गजानन एकबोटे आपल्या "आंबेडकर तत्वज्ञान " या पुस्तकात लिहितात भारतीय स्त्रीची सामाजिक उच्च दर्जाची बुद्धकालीन जी परमोच्चता कालांतराने अवनत झाली तिला जबरदस्त हादरे देण्याचे काम महात्मा फुले यांनी केले.त्याच ज्योतीने प्रज्वलीत होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांना न्याय देण्याकरिता जे कार्य केले ते युगप्रवर्तक व ऐतिहासिक असेच आहे. भारतीय स्त्रियांच्या हातापायात जखडलेल्या गुलामगिरीच्या बेड्या तोडणारी महत्वपूर्ण घटना म्हणजेच भारतीय घटनाप्रमुख म्हणून स्त्री स्वातंत्र्याच्या दृष्टीने अभूतपूर्व असे बिल सादर केले.स्त्रीधन ,घटस्फोट,आदी दृष्टीने स्त्रियांना जगण्याचे कायदेशीर अधिकार प्राप्त झाले. तसेच मतदान,शिक्षण, रोजगार यांची राज्यघटनेने हमी दिली.तद्नंतर हुंडाविरोधी ,बलात्कारविरोधी,स्त्रीधनावर स्त्रीचा हक्क ,सासरच्या मंडळींकडून होणारा छळ ,जळीत प्रकरण, घटस्फोट आदी संबंधित अनेक कायद्यात स्त्रियांची बाजू भक्कम करण्यात आली. डॉ.आंबेडकरांनी वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांनाही मोलाचा सल्ला दिला. देवदासी व वेश्याव्यवसाय यात दलित स्त्रियांचे प्रमाण फार मोठे आहे आणि हे घरातील दारिद्र्यामुळे आहे.जागोजागी विषमतेचे विष पेरणाऱ्या आणि स्त्रीक्षुद्राना सामाजिक न्याय नाकारणाऱ्या मनुस्मृतींचे कायदा संहिता बदलून भारतातील लोकशाही मूल्यांवर स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आधारित नावे कायदा संहिता भारतासाठी निर्माण करण्यात त्यांनी मोलाची कामगिरी केली. मनुस्मृतींची स्त्री कडे बघण्याची वृत्ती निर्लज्जपणाची होती , बंदी असतानाही चोरुनलपुन मनुस्मृती ची विक्री केली जात होती.हे त्यांनी सरकारच्या दृष्टीस आणले.स्त्री शिकल्याशिवाय त्यांच्यात उन्नती होणार नाही. प्रत्येक माणसात आत्मविश्वास निर्माण करण्याचे शिक्षण हे प्रभावी साधन आहे,हे त्यांनी सांगितले.

स्त्री शिक्षणाचे महत्व पटवून देताना " तुम्ही सर्वप्रथम शिक्षित व्हा ,स्वच्छता पाळा, आपल्या मुलामुलींना शिकवा,त्यामुळे देशाचा विकास होईल .तुम्ही पण माणूस आहात अशी तुमची ओळख होईल ,शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही " असे शिक्षणाचे महत्व डॉ.आंबेडकरांनी विषद केले. स्त्रीयांना दिली जाणारी ही दुय्यम दर्जाची वागणूक बाबासाहेबांना कशी सहन होणार. आपल्या एका ग्रंथात ते म्हणतात "In thy presence is pleasure of the joy" केव्हढा हा हळुवार भाव आणि स्त्रियांविषयी मनाच्या ठिकाणी असणारा मोठेपणा. बाबासाहेबानी दि.27 डिसेंबर 1927 रोजी स्त्रियांना उद्देशून जे भाषण केले त्यात स्त्रीशिक्षणाचे महत्व विशद करताना "तुम्हीं आपल्या मुलींनाही शिक्षण दिले पाहिजे. ज्ञान व विद्या




या गोष्टी काही पुरुषासाठीच नाहीत.त्या स्त्रियांनाही आवश्यक आहेत. असा त्यांनी आवर्जून उल्लेख केला होता. पण त्याचबरोबर अस्पृश्य समाजाच्या प्रगतीसाठी अस्पृश्य स्त्रियांचीही प्रगती होणे आवश्यक आहे. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे कट्टर समर्थक होते.त्यांच्यावर महात्मा फुले यांच्या कार्याचा व तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या शिकवणुकीचा प्रचंड प्रभाव होता. समाजमुल्य वाढवण्यासाठी स्त्री शिक्षण फार गरजेचे आहे. कोणत्याही समाजाचे मूल्यमापन त्या समाजातील स्त्रियांची परिस्थिती कशी आहे ,यावरून करता येते.त्यासाठी समाजाने स्त्रियांना विकास करण्याची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. कायद्याएवढेच बाबासाहेब आंबेडकरांचे महत्वाचे योगदान म्हणजे त्यांनी दिलेली शुद्ध भारतीय बैठक ".

वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांत दलित स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे.हा व्यवसाय मानवजातीला आणि दलित समाजाला काळिमा फासणारा आहे. म्हणून त्यांनी कामाठी पुऱ्यातल्या वेश्याना सांगितले की "हा व्यवसाय सोडा ,लग्न करा ,गरिबीतही स्वाभिमानाने संसार करा".अनेक इच्छुक तरुणांचे वेश्यासोबत विवाह लावून देऊन बाबसाहेबांनी आपल्या विचारला कृतीची जोड दिली. खरे तर ग्रामीण व शहरी भागातील स्त्रियांच्या समस्या जवळपास सारख्याच आहेत.परंतु आपल्या समस्या सोडवण्यासाठी स्त्रियांचा असा वेगळा दबावगट होऊ शकला नाही.स्त्रियांनो पुरुषांच्या बरोबरीने पुढे या अशी बरोबर येण्याची हाक बाबासाहेबांनी दिली.त्यासाठी जातीभेद विरहीत संघटना स्थापन करा.जातीचे बांध विसरून सर्व शोषित व मागास स्त्रियांनी एकत्र व्हायला हवे हे बाबासाहेबांना अभिप्रेत होते.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वप्न पाहिलेला सुसंस्कृत समाज आम्ही आजही तयार करू शकलो नाही याची आम्हाला खंत वाटते.आजही आंतरजातीय विवाहाचे प्रमाण वाढलेले नाही. हुंड्यासाठी महिलेचा होणारा मानसीक व शारीरिक छळ , महिलांवर होणारे लैंगिक अत्याचार , वर्ण काळा असल्याने घरात होणारी कुचंबणा , जाणूनबुजून केले जाणारे अल्पवयीन विवाह हे आजही कमी झालेले नाहीत. आम्ही आमचा प्राचीन इतिहास पुरता पुस्तकात बंद करून ठेवलाय.त्या स्त्रीला आदिशक्ती ,आदीतत्व मानले जात असे. त्याकाळी समाजाने तिला अनन्यसाधारण महत्त्व दिले व तिचा सर्वस्तरावर गौरव केला. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि स्त्रियांप्रती असणारे कार्य देशातील क्षुद्र अतिक्षुद्र आणि स्त्रियांच्या चळवळीसाठी सदैव प्रेरणादायी असेच आहे. स्त्रियांना सन्मान देण्याकरिता त्यांनी मांडलेले विचार व बिलासंबंधी त्यांनी सुचविलेल्या तरतुदी यातून त्यांचा स्त्रीवादी दृष्टीकोन स्पष्ट होतो. तुमच्या गुलामगिरीचे प्रदर्शन करणाऱ्या कथलांच्या नकली दागिन्याला फेकून द्या. असे ते महाडला भाषणात म्हणाले होते. बलात्कार, हुंडाविरोधी अनेक कायदे बाबासाहेब आंबेडकरांनी अंमलात आणून स्त्रीला समाजात निर्भयपणे जगायला शिकवले. प्रत्येक भारतीय स्त्रीने बाबासाहेबांचे ऋणी असायला हवे इतके अनंत उपकार त्यांनी आपल्यावर केलेत. बाबासाहेबाना स्त्री विषयी आपुलकी होती.याचे कारण म्हणजे त्यांच्या जीवनात आलेल्या स्त्रियांचा अनुभव. त्यांची आई भीमाई व नंतर आयुष्यात आलेली रमाई . एक स्त्री शिकली की संपूर्ण कुटुंब सुधारते असे आपण म्हणतो ते उगीचच नाही. म्हणून स्त्री शिक्षणाकडे पाठ दाखवून चालणार नाही हे त्यांनी समजावले.समाज व त्यातील जे वर्ग त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांचे शोषण करतात ,त्यांना त्यांच्या कोणत्याही कामात शैक्षणिक जागृतीमुळे यश येत नाही. कारण अज्ञानमूलक भोळ्या समजुती शिक्षणामुळे नष्ट होतात.शिकला की मनुष्य निर्भय होतो ,जागृत होतो हे ओळखून बाबासाहेबांनी शिक्षण हे माणसाची गुलामी नष्ट करण्याचे व त्याच्यात स्वत्वाची ओळख करुन देण्याचे व सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे साधन मानले आहे.थोडक्यात भारतीय स्त्रियांमध्येही उच्च शिक्षणाचा प्रसार झाल्याखेरीज त्यांच्यात स्वत्वाची जाणीव निर्माण होऊन त्या निर्भय बनणार नाहीत. म्हणून त्यांनी अस्पृश्य व दलित स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. शिकलेल्या महिलांसाठी ,कामगार महिलांसाठी एक महिन्याची हक्काची रजा , शारीरिक दुखापत झाली तर नुकसान भरपाई, आणि वीस वर्षांची सेवा झाल्यास निवृत्तीवेतनाची तरतूद हे महत्वाचे कार्य केले. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते सामाजिक न्यायचा लढा व्यवस्थित यशस्वी होण्यासाठी समाजाच्या वैयक्तिक कायद्यामध्ये जाती व्यवस्था आणि पुरुषप्रधानता यांना नकार देऊन समान वैयक्तिक संबंधाची पायाभरणी करणे महत्वाचे आहे. कामगार किंवा मजूर महिलेला प्रसूतीरजाहक्क मिळवून देणारे बाबासाहेब जगातील पहिले व्यक्ती आहे.यानंतर संपूर्ण जगातील अनेक देशातील महिला कामगारांना हा हक्क मिळाला आहे. निसर्ग सुंदर अश्या भारतात जन्मलेल्या समस्त स्त्री जातीचे भीमरावांनी सोने केले. बाबासाहेब एक महान कार्य करणारे व्यक्तीच नाही तर स्त्रियांसाठी मसीहा म्हणून जन्माला आले. आपण सर्वांनी त्यांच्या सांगितलेल्या विचारावर मार्गक्रमण केले पाहिजे. भारतीय स्त्रियांनीही आपल्याला मिळालेल्या हक्काचा गैरवापर न करता आपल्या समाजासाठी जेव्हढे योगदान देता येईल तेव्हढे दिले पाहिजे. माझ्या माता भगिनींना न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र झटणारे भिमाईचे सुपूत्र बोधिसत्व ,दलितांचे कैवारी, समाजभूषण भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना कोटी कोटी प्रणाम.

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती छत्रपती संभाजीनगर
जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली,
शहागंज गांधी पुतळ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर मो : 9422201977

Walsekar Metal Private Limited
Manufacturer of Aluminium Alloy Cas ting
Address : K-58, MIDC AREA WALUJ, AURANGABAD-431136

# बोगस खतामुळे नुकसान

## उपविभागीय अधिकाऱ्यांनी बांधावर जाऊन केली पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सोयगाव कृषी विभागाच्या वतीने दि.२०/७/२३ गुरुवार रोजी बहुलखेडा, कवली, उंबरखेडा, अनाड, राक्सा, मालखेडा व हिंगणा येथील शेतकऱ्यांनी सरदार ॲग्रो फर्टीलायझर ॲंड केमिकल्स या कंपनीचे मटरेल खत सुपर फॉस्फेट पावडर दाणेदार कपाशी पिकाला दिल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

सदर डॉ. सी.बी.पवार सहयोगी प्राध्यापक औरंगाबाद, डॉ.के.ऐ. सुकाशे कार्यक्रम समन्वयक एम.जी.एम., के.व्ही.के. गांधीली औरंगाबाद व सुभाष आघाव उपविभागीय अधिकारी सिल्लोड, सोयगाव यांनी नुकसान बाबत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन कपाशी, सोयाबीन पिकाची पाहणी केली. असता शेतकऱ्यांनी हे खत आम्ही जवळच असलेले पाचोरा तालुक्यातील पिपळगाव येथील शिवशक्ती कृषी केंद्राचे गोडाऊन पिपळगाव येथे असून येथून सरदार ॲग्रो ॲंड केमिकल्स या कंपनीचे सुपर



फॉस्फेट पावडर नावाचे खत खरेदी केले. हा तेच खत आम्ही आमच्या शेतात कापूस पिकवला दिले असता काही दिवसानंतर सदर कापूस पिकाचे शेंडे फांद्या जमा होऊन लाल झालेल्या दिसले त्यामुळे सदर खताचा कापूस या पिकावर वाईट परिणाम होऊन संपूर्ण कापूस पिकाचे १०० टक्के नुकसान झाले आहे, अशी माहिती शेतकऱ्यांनी सोयगाव कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिली. सदर पीक काढून टाकण्यासाठी आमच्या कडे पर्याय उरला नाही तरी आपण सदर पिकाची पाहणी करून आम्हाला नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी शेतकरी बोलत होते.

सरदार कंपनीचे खत दिल्यामुळे आमच्या कापूस पिकाचे झालेल्या नुकसानीची पाहणी करतांना यावेळी उपविभागीय कृषि अधिकारी सुभाष आघाव, तालुका कृषि अधिकारी मदन सिसोदिया, साहेब, शास्त्रज्ञ सी. बी. पाटील NARP औरंगाबाद, शास्त्रज्ञ काकासाहेब सुकासे, मंडळ कृषि अधिकारी संपत वाघ, रमेश गुंडीले मंडळ अधिकारी, कृषि पर्यवेक्षक प्रदीप पाटील, कृषि सहाय्यक मानसिंग भोळे, कृषी सहाय्यक अर्जुन सुरडकर, कृषी सहाय्यक मयुर पाटील, कृषी पर्यवेक्षक अतुल पाटील व नुकसानग्रस्त शेतकरी, कवली, घोसला, अनाड, उंबरखेडा, बहूलखेडा, राक्सा, मालखेडा व हिंगणा येथील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ४ गावठी पिस्तूलसहित मुद्देमाल हस्तगत

## पोलीस निरीक्षकांना दहा हजारांचे बक्षीस

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** बेकायदेशीरपणे गावठी बंदुका बाळगल्याच्या दोघांविरुद्ध शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. त्यांच्याकडून चार गावठी बंदुका, सात जिवंत काडतुसे असा एक लाख ९७ हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे इसरार फारूकी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार नीलेश गायकवाड आणि मनिष सावंत या दोघांनी बेकायदेशीरपणे गावठी बंदुका बाळगल्या असल्याची माहिती मिळाल्यावरून हाडाखेड गाव शिवारातील तपासणी नाक्यावर गुरुवारी रात्री दोघांना पकडण्यात आले. मुंबई-आग्रा महामार्गावर ही कारवाई करण्यात आली. संशयित नीलेश आणि मनिष या दोघांविरूद्ध शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी गुन्हेगारी मोडून काढणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी १० हजार रूपयांचे बक्षीस जाहीर केले.



# कोरोना योद्ध्यांना सिव्हिल हॉस्पिटल येथे रुजू करा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रात करोना काळ हा खूप भयंकर होता त्याचप्रमाणे त्याचा प्रकोप धुळे जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात होता. अशा वेळेस धुळे शहरातील सिव्हिल हॉस्पिटल येथे कंत्राटी कर्मचारी भरण्यात येत होते परंतु अशा भयानक महामारीत कोणीच काम करायला तयार नव्हते परंतु अशा वेळेस आम्ही जीवाची परवा न करता कोरोना योद्धा म्हणून येथे रुजू झालो रुग्णाचे डायपर चेंज करण्यापासून ते त्याची पूर्ण देखभाल डॉक्टरांच्या खांद्याला खांदा लावून काम केले असे ह्या निवेदनात म्हटले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात कोरोना मुक्त धुळे जिल्हा हा प्रथम आला. परंतु आज ज्या कोरोना योद्धांमुळे धुळे जिल्हा प्रथम आला व आमची अवस्था खूप बिकट आहे कोरोना संपल्यापासून आम्हाला कामावरून काढण्यात आले आम्ही अनेकदा पालकमंत्री, पालिका आयुक्त, आमदार, ग्रामीण आमदार, नगरसेवक, व तुम्हाला अनेक निवेदन देऊनही आमची कुठलीही दखल घेतली नाही आमची मागणी फक्त सिव्हिल हॉस्पिटल येथे आम्हाला कामावर कायम रुजू करून घ्या एवढीच आहे असे ही निवेदनात सांगण्यात आले. सिविल हॉस्पिटल येथे कर्मचारी नसल्याने अवस्था खूप बिकट आहे. आम्हाला कामाचा मोठा अनुभव असल्यामुळे या भरतीत किंवा किंवा सरळ सेवेत सामावून घ्या ही विनंती करण्यात आली आहे. कोरोना योद्धा म्हणून ५० ते ६० मुलं तुमच्या शेवटच्या अपेक्षावर टिकून आहेत धुळे जिल्ह्यात बेरोजगारी खूप मोठ्या प्रमाणात आहे आपण या 60 मुलांना रोजगार दिल्याने धुळे जिल्ह्यात खूप मोठा योगदान असणार आहे. म्हणून आपणास कळकळीची विनंती आहे की आपण ह्या विषयावर लक्ष देऊन तात्काळ आम्हाला सिविल हॉस्पिटल येथे भरती करून घ्या, असे ह्या निवेदनाच्या माध्यमातून सांगण्यात आले.

प्रवेश देणे चालु आहे. महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त प्रवेश देणे चालु आहे.
बी.ए. मोफत प्रवेश
बी.बी.ए.
बी.कॉम
बी.एस.स्सी. मोफत प्रवेश
एम.लिब मोफत प्रवेश
बी.एस.स्सी. होम सायन्स मोफत प्रवेश
बी.डिझाईन मोफत प्रवेश
बी.एस.स्सी. मोफत प्रवेश
एम.ए. पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन मोफत प्रवेश
डि.लिब मोफत प्रवेश
MSBTE डिप्लोमा इन फायर सर्व्हिस इंजी.(FR)
MSBTE ॲडव्हान्स डिप्लोमा इन इंडस्ट्रीयल सेफ्टी (IT)
MSBTE ॲडव्हान्स डिप्लोमा इन इंडस्ट्रीयल सेफ्टी ॲण्ड सेक्युरिटी मॅनेजमेंट
MSBTE पी.जी.डी.एम.एल.टी.
MSBSVET बांधकाम पर्यवेक्षक (Construction Supervisor)
NCVT/DGET इलेक्ट्रीशियन
NCVT/DGET फिटर
NCVT/DGET फायर टेक्नॉलॉजी ॲण्ड इंडस्ट्रीयल सेफ्टी मॅनेजमेंट
११वी शै.पात्रता : १० वी पास आर्टस् / कॉमर्स / सायन्स
१२वी शै.पात्रता : ११ वी पास आर्टस् / कॉमर्स / सायन्स
VBSS Group ऑफिस - ई-विंग, भारत बाजार, API कॉर्नर, प्रोझोन मॉलजवळ, छ.संभाजीनगर (औरंगाबाद)
Mob.: 90210 80 808 | 7251977777 | 7020 12 9601 | 8378080808

# वाचनालयाकडे येणारी पावले वाढली पाहिजेत

## डीवायएसपी कृष्णात पिंगळे : सार्वजनिक वाचनालयात ग्रंथ प्रदर्शन

आधुनिक केसरी न्यूज



**भुसावळ :** व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी वाचन आवश्यक आहे. वाचनामुळे आपली विचार करण्याची क्षमता वाढत जाऊन आपण मानसिकरित्या सक्षम होत जातो. त्यामुळे आधुनिक काळात वाचनाची विविध साधने उपलब्ध असली तरी वाचनालयाकडे येणारी पावले वाढली पाहिजेत, असे प्रतिपादन भुसावळ विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी कृष्णात पिंगळे यांनी केले. भुसावळ येथील डीएस हायस्कूललगत असलेल्या सार्वजनिक वाचनालयाच्या 153 व्या वर्धापनदिनी आयोजित ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी के. नारखेडे विद्यालयाचे प्राचार्य नितीन किरंगे, म्युनिसिपल हायस्कूलचे मुख्याध्यापक ललित फिरके, बालभारतीच्या मराठी भाषा अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. जगदीश पाटील, वाचनालयाचे ग्रंथपाल नितीन तोडकर यांची उपस्थिती होती. प्रारंभी दीपप्रज्वलन करून सरस्वती मातेच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर डीवायएसपी कृष्णात पिंगळे यांच्या हस्ते फीत कापून ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविकात ग्रंथपाल नितीन तोडकर यांनी वाचनालयाचा इतिहास सांगून वाचनालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. डीवायएसपी कृष्णात पिंगळे हे नुकतीच एलएलबी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा सहृदय सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. जगदीश पाटील यांनी तर आभार सहाय्यक ग्रंथपाल अवधूत दामोदरे यांनी मानले. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष हिंमत ठाकूर (मुन्नाभाऊ), संचालक हरीश पाटील, मिलिंद भारंबे, कोटेचा महाविद्यालयातील प्रा. आर.एच. पाटील, भुसावळ गट साधन केंद्रातील विषय तज्ज्ञ संजय गायकवाड, प्रसाद काळवीट, रमेश पाटील, सुवर्णा बोरसे, अनिल गुजराथी, राजेश मोरे, राजाराम डोमसे, विनोद हासे, वाचनालयाचे सहाय्यक ग्रंथपाल अवधूत दामोदरे, सेवक होनाजी चौधरी यांच्यासह वाचकांची उपस्थिती होती. तीनदिवशीय कार्यक्रम - सार्वजनिक वाचनालयात आयोजित तीनदिवशीय ग्रंथ प्रदर्शनात सुमारे पाचशेच्या वरून ग्रंथ ठेवण्यात आले असून ग्रंथालयात विविध प्रकारची हजारो दुर्मिळ पुस्तके उपलब्ध आहेत. वाचकांनी याचा लाभ घ्यावा. तसेच या तीन दिवसात भुसावळ येथील के. नारखेडे विद्यालय व म्युनिसिपल हायस्कूलमध्ये जाऊन वाचनालय आपल्या शाळेत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. यात शिक्षक व विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल नितीन तोडकर यांनी केले आहे.

# सारिका माळी यांची साहाय्यक रासायनिक विश्लेषक पदाला गवसणी

आधुनिक केसरी न्यूज

**पिलीव :** महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात



आलेल्या फॉरेन्सिक डिपार्टमेंट मधील सहाय्यक रासायनिक विश्लेषक या पदाला माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील सारिका ज्ञानेश्वर माळी यांनी पहिल्याच प्रयत्नात गवसणी घातली आहे. सारिका माळी यांचे पहिली ते दहावी शिक्षण आटपाडी तालुक्यातील दिघंची येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. तर अकरावी/बारावी आटपाडी येथील आबासाहेब खेबूडकर ज्यू.कॉलेज येथे झाले. त्यानंतर BSC एस,पी कॉलेज पुणे येथे झाले. तर MSC सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी मध्ये झाले. सारिका माळी यांचे पती ज्ञानेश्वर दत्तात्रय माळी यांची पिलीव सह सोलापूर, पुणे, मुंबई तसेच देशभर प्रसिध्द ग्राफिक डिझायनर म्हणून ओळख आहे. तर सारिका यांचे दीर तुषार दत्तात्रय माळी हे मुंबई येथे STI आहेत.सासरे दत्तात्रय माळी हे सेवानिवृत्त एस.टी. ड्रायव्हर सासू या अंगणवाडी सेविका त्यामुळे सारिका माळी यांची पिलीव परिसरामध्ये साक्षर व सुशिक्षित कुटुंबाची सून म्हणून ओळख आहे. माझे पती ज्ञानेश्वर दत्तात्रय माळी यांचे खूप मोठे सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे, असे सारिका यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. सारिका यांच्या उत्तुंग यशाबद्दल विविधस्तरातूनकौतुका होत आहे.

# पोलिस निरीक्षकांनी दिला सज्जड इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** पोलीस स्टेशन परतुर येथे नव्याने रुजू झालेले एम. टी. सुरवसे यांनी आज रोजी परतुर शहरातील सिकलकरी समाजाचे नवयुवक यांची गुरूद्वारा येथे मीटिंग घेण्यात आली होती. सदरच्या मीटिंगमध्ये त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या तसेच परतूर शहरात व परिसरात चोरी कोणतीही चोरट्यांनी चोरी केल्यास ती आम्ही पकडणार आणि त्यांचेवर कठोर कारवाई करण्यात येईल, तसेच काही रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत त्यांच्यावर हद्दपार, एमपीडीए, मोका यासारखी कठोर कारवाई तयार करणे चालू आहेत, त्यामुळे अशा प्रकारच्या गोष्टीचा अवलंब न करता आपले जीवन कसे सुधारेल याकडे लक्ष देऊन सर्वांनी सूचनांचे पालन करणे बाबत समज दिली व अशा प्रकारचा इशारा देण्यात आलेला आहे.



# परतूर शहरात पान टपऱ्यांमधून सर्रास गुटखा विक्री; पोलीस प्रशासनाची डोळेझाक

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** राज्यात गुटखाबंदी लागू करण्यात आलेली असतांना जालना जिल्ह्यासह परतुर तालुक्यात अवैधरित्या गुटख्याची विक्री आणि वाहतूक सर्रासपणे सुरू आहे. याकडे अन्न व औषध प्रशासन आणि पोलिस प्रशासनाचे सोयीस्कर दुर्लक्ष होत आहे. गुटखा माफियांशी संगनमत करून काही अधिकाऱ्यांनी 'खाबूगिरी' सुरू केल्यामुळे गुटखाबंदीला तालुक्यात हरताळ फासला गेला आहे. शासनस्तरावरून गुटखाबंदी लागू करण्यात आलेली असली तरी या बंदीची अंमलबजावणी मात्र शून्य असल्याचे दिसून येत आहे. काही अधिकाऱ्यांनी गुटखा माफियांशी संगनमत केल्यामुळे या बंदीची पायमल्ली केली होत आहे. गोवा, राजनिवास, विमल, मानिकचंद, या सारखा गुटखा सर्रासपणे परतुर शहरासह ग्रामीण भागात रोज सकाळी सकाळी गुटख्याची विक्री होत आहे. त्याची बिनबोभाट वाहतूक केली जात आहे. यामुळे सर्व सामान्यांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे.

अनेक युवक गुटख्याच्या अधीन होत आहे.गुटखा माफियांशी संबंधित अधिकाऱ्यांनी हात मिळवणी केल्यामुळे गुटख्याची अवैध विक्री होत असुन परतुर शहरात मुख्य रस्त्यावरील बहुतांश पानटपऱ्यांवर अवैध गुटखा विक्री होत आहे आणी वाहतुकीवर बंदी कोण घालणार ? असा प्रश्न उपस्थित होत आहे . तरी स्थानिक पोलिस प्रशासन व अन्न औषध विभागाचे कर्मचारी मुद्दामुन डोळझाक करीत असल्याची चर्चा परतुर शहरात ऐकायला मिळत आहे .

# उपजिल्हाप्रमुखपदी केशव राठोड यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील सीतानाईक तांडा येथील सरपंच




केशव राठोड यांनी शिवसेनेच्या उपजिल्हाप्रमुखपदी निवड करण्यात आली आहे . केशव राठोड यांना तालुक्यात मानणारा तरुणवर्ग असून त्यांनी मागील काही महिन्यांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन पालकमंत्री संदीपान भुमरे यांच्या प्रमुख उपास्थितीत शिवसेनेत असंख्य कार्यकर्त्यांसह प्रवेश केला होता.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भरतसिंग राजपूत यांनी केशव राठोड यांना नियुक्तीपत्र देऊन उपजिल्हाप्रमुखपदी निवड केली आहे. निवडीबद्दल पालकमंत्री संदीपान भुमरे, मंत्री संजय राठोड, मंत्री अब्दुल सत्तार, जिल्हाप्रमुख भरतसिंग राजपूत, रमेश पवार यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवसैनिकांनी अभिनंदन केले आहे. तसेच केशव राठोड़ हे युवा वर्गाला सोबत घेऊन अनेक संस्कृतिक धार्मिक क्रीड़ा सारख्या कार्यक्रमात सहभाग नोंदवतात, त्याच प्रमाने नेहमि गांवाच्या विकास कामा साठि धड़पड करीत असल्याने गांवकऱ्यांनी त्यांच्या हातात सत्ता ही दिली आहे सध्याला से युवा सरपंच आहे. तसेच त्यांच्या या प्रवेशामुळे त्यांच्या गावात विकास निधि उपलब्ध होईल, आणि पेंडिंग असलेले विकास कामे पुनरूति कामे सुरुवात होणार असल्याची माहिती मिळत आहे.

# अन्विषा राजपुतने पटकावले सुवर्ण पदक

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शहरातील जिल्हास्तरीय तायकोंदो स्पर्धेत अनविष बलदेवसिंह राजपूत ने अंतिम फेरीत आपल्या प्रतिस्पर्धीवर विजय मिळवून जिल्हा स्तरीय तायकोंदो स्पर्धेत सुवर्ण पदक पटकाविले. अनविषा ही येथील माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांची नात आहे. तर डॉ.बलदेवसिंह धोंडीरामसिंह राजपूत यांची कन्या आहे. तिने प्राप्त केलेल्या या सुवर्ण पदकाबद्धल सर्वत्र तिचे अभिनंदन होत आहे.



# दीपक निकाळजे वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

सुशिल गायकवाड

**लोणंद :** नीरा ता.पुरंदर येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए)





या पक्षाचा वर्धापनदिन आणि राष्ट्रीय अध्यक्ष दीपकभाऊ निकाळजे यांच्या वाढदिवसानिमित्त भीम सामाजिक विकास प्रतिष्ठान (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.याबाबतची माहिती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) या पक्षाचे पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष अमोल साबळे यांनी दिली.

गुरूवार दिनांक २७ जुलै रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप,वृक्षलागवड, अन्नदान, ग्रामपंचायत कर्मचारी महिलांना साडी वाटप,तसेच रुग्णांना फळे वाटप आदी महत्त्वपूर्ण कार्यक्रम संपन्न करण्यात येणार आहे.यावेळी पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित असणार आहेत.राष्ट्रीय अध्यक्ष दीपकभाऊ निकाळजे यांच्या वाढदिवसानिमित्त सर्वत्र विविध उपक्रम घेतले जात असतात.अमोल साबळे यांच्या कडून ही दरवर्षी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करताना एक सामाजिक बांधिलकी जपली जात असते.तसेच वर्षभरात ही विविध उपक्रमशील कार्यक्रम घेतले जात असतात.पक्षाचा वर्धापनदिन आणि राष्ट्रीय अध्यक्ष दीपकभाऊ निकाळजे यांचा वाढदिवस सामाजिक हित लक्षात घेऊनच हे दोन्ही कार्यक्रम घेण्याचा मानस अमोल साबळे यांचा असतो.नीरा शहरातुनच नव्हे तर पुरंदर तालुक्यातून अमोल साबळे यांनी सामाजिक कार्यात एक वेगळी ओळख निर्माण केलेली आहे.

समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो.त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाप्रति काम करणे ही आपली जबाबदारी असल्याचे अमोल साबळे यांनी म्हटलेले आहे.अमोल साबळे यांच्या कार्याबद्दल सुद्धा समाजातून चांगली भावना व्यक्त केली जात असते.दीपकभाऊ निकाळजे यांच्या मार्गदर्शना खाली समाजहिताचे असेच कार्य करत राहणार असल्याचे अमोल साबळे यांनी म्हटलेले आहे.या उपक्रमास सर्वांनीच उपस्थित राहण्याचे आवाहन अमोल साबळे यांनी केलेले आहे.



# लोकविकास नागरी सहकारी बँक लि., औरंगाबादची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** लोकविकास नागरी सहकारी बँकेंची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक १६/०७/२०२३ रोजी गुलाब विश्व हॉल, टि.व्हि सेंटर रोड, सिडको, औरंगाबाद येथे उत्साहात संपन्न झाली. सभेची सुरूवात अध्यक्ष, उपाध्यक्षा, सर्व संचालक व जेष्ठ सभासदांच्या हस्ते दिप प्रज्वलन व लक्ष्मी पुजनाने झाली. यानंतर सभेच्या प्रत्यक्ष कामकाजास सुरूवात होवून विषय सुचीप्रमाणे सर्व ठरावांना टाळयांच्या कडकडामध्ये उपस्थित सभासदांनी सर्वानुमते मंजूरी दिली. याप्रसंगी सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे निराकरण करण्यांत आले. सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित असलेल्या सभासदांनी आपले मनोगत व्यक्त करून बँकेच्या प्रगतीविषयी सभासदांनी समाधान व्यक्त केले. नियमित कर्ज परतफेड करणा-या कर्जदार व ठेवीदारांचा सत्कारही याप्रसंगी करण्यांत आला.

बँकेच्या उपाध्यक्षा सौ. अनुराधा अंबादास दानवे यांनी बँकेच्या वर्षभरातील प्रगतीचा लेखाजोखा उपस्थित सभासदासमोर मांडला. बँकेचे संचालक श्री. जे. के. जाधव व श्री. दिपक अहिरे यांनीही याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. बँकेचे अध्यक्ष मा.आ. श्री. नामदेवराव पवार यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना बँकेने नव्याने सुरू केलेल्या एक्सप्रेस वाहन तारण कर्ज योजनेचा शुभारंभ वार्षिक सभेच्या मुहर्तावर करून अतिशय सुलभ व सोपी वाहन कर्ज योजना बँकेच्या वतीने सभासदांसाठी सुरू करण्यांत आली. भारतीय रिजर्व बँकेने सुदृढ व सुव्यवस्थापन असलेली बँक (FSWM) या नामांकनात बँकेचा लवकरच समावेश होणार आहे. बँकेची प्रगती सार्वत्रिक निवडणूकीनंतर बेगाने व सुरक्षितपणे सुरू आहे. सभासदांच्या व ठेवीदारांच्या देवी सुरक्षित असून लवकरच बँक 200 कोटी ठेवीचा पल्ला पार करणार आहे, असा विश्वास त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

बँकेचे संपुर्ण संचालक मंडळ बँकेच्या वाढीसाठी प्रयत्नशील असून बँकेच्या 2 शाखांचे लवकरच स्वमालकीच्या इमारतीमध्ये स्थलांतर होत आहे. बँकेच्या वाढीसाठी सर्व सभासदांनी आपले आर्थिक व्यवहार व गरजा लोकविकास बँकेच्या माध्यमातून घ्याव्या असे आव्हान त्यांनी उपस्थित सभासदांना याप्रसंगी केले. सन 2022-23 या आर्थिक वर्षासाठी भारतीय रिजर्व बँकेच्या परवानगीने 10 टक्के लाभांशाची घोषणा बँकेचे अध्यक्ष मा. आ. श्री. नामदेवराव पवार यांनी केली. याप्रसंगी बँकेच संचालक श्री. मुरलीधर रामराव जगताप यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यांत आली. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या उपस्थित प्रसंगी बँकेचे अध्यक्ष मा. आ. श्री. नामदेवराव पवार, उपाध्यक्षा सौ. अनुराधा अंबादास दानवे, संचालक सर्वश्री जे. के. जाधव, विनायक नारायण गवळी, विजय बारसु खाचणे, मुरलीधर रामराव जगताप, श्रीमंत आनंदराव उकिर्डे, माधव नामदेव जेउघाले, दिपक लक्ष्मणराव अहिरे, सौ. विमल पोपटराव जाधव, सर्वश्री विक्रांत जगन्नाथ जाधव, भाऊसाहेब तेजराव काळे, गणेश रंगनाथ नागरे, बद्रीनाथ कृष्णा ठोंबरे, प्रतिक उमाकांत ठोबरे, अमित विनायकराव बोरसे, अकिल जाफर पटेल, व्यवस्थापन मंडळाचे श्री. पोपटराव रामचंद्र जाधव, श्री. भगवान डोळे, बँकेचे अधिकारी डॉ. संजय औटी व सर्व कमचारी वर्ग यांची उपस्थिती होती.



## सौ.आशाताई शिंदे यांचा अभीष्टचिंतन सोहळा मतदारसंघात जल्लोषात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय कर्तव्यदक्ष आमदार शामसुंदर शिंदे यांच्या सुविद्य पत्नी तथा शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई शामसुंदर शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवार दि. 20 जुलै रोजी लोहा कंधार मतदारसंघात विविध ठिकाणी कार्यकर्त्यांनी सामाजिक उपक्रमासह धार्मिक कार्यक्रम राबवून आशाताई शिंदे यांचा अभिष्टचिंतन सोहळा मतदारसंघातील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उत्साहात साजरा केला. आमदार शिंदे यांच्या नांदेड येथील निवासस्थानाहून कार्यकर्त्यांच्या वाहनांचा मोठा ताफा निघून सकाळी नांदेड शहरातील सर्व महामानवांच्या पुतळ्यांना आशाताई यांनी अभिवादन केले, यानंतर ढवळे कॉर्नर किवळा उस्माननगर, पांगरा, कंधार बहादरपुरा व लोहा शहरात महामानवांच्या पुतळ्याला आशाताईंनी अभिवादन केले. मतदार संघात विविध ठिकाणी क्रेनच्या साह्याने आशाताई यांना मोठमोठे हार व फटाक्यांची भव्य आतिषबाजी करत कार्यकर्त्यांनी आशाताईंचा वाढदिवस जल्लोषात साजरा केला. विकी गार्डन मंगल कार्यालय पारडी येथे आशाताई शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या अभिष्टचिंतन सोहळ्याला शेतकरी कामगार पक्षाचे अध्यक्ष भाई आमदार जयंत पाटील, शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या चित्राताई पाटील, प्रसिद्ध उद्योजक रेड्डी, नांदेड महानगरपालिकेच्या महापौर जयश्रीताई पावडे, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील, लोह्याचे नगराध्यक्ष गजानन सावकार सूर्यवंशी, खरेदी विक्री संघाचे सभापती स्वप्नील पाटील उमरेकर, कंधार बाजार समितीचे माजी सभापती ज्ञानेश्वर पाटील चोंडे, उपसभापती श्याम अण्णा पवार, शेकाप ग्रामीण जिल्हाध्यक्ष अवधूत पाटील शिंदे, शेकाप जिल्हाध्यक्ष बालाजी ईसातकर यासह विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील सर्व मान्यवर व मतदारसंघातील शेतकरी कामगार पक्षाचे हजारो कार्यकर्ते हितचिंतक यांनी आशाताईंना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी मोठी गर्दी केली होती. सकाळी विकी मंगल कार्यालयामध्ये प्रसिद्ध कीर्तनकार ह .भ. प. अक्रूर महाराज बिड यांच्या कीर्तनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी साधू संतांचा व वारकऱ्यांचा सन्मान करण्यात आला याप्रसंगी मोठ्या संख्येने भावीक भक्त, महाराज मंडळी, भजनी मंडळी, कार्यकर्ते व महिला उपस्थित होते.

## अधिकाच्या महिन्यामुळे जावई जोमात, सासरा कोमात

आधुनिक केसरी न्यूज

> हा पुरुषोत्तम मास आहे . दान करणे हे पावित्र्य असल्याने, धोंड्याच्या महिन्यात तर जावयांना आवर्जून धोंडे दान करायला हवे .
> -धनंजय ( देवा ) जोशी .

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** सर्वसामान्य कुटुंबामध्ये जून-जुलै महिना आर्थिक चचणीचा असतो. या महिन्यात शेतकऱ्याला शेतातून उत्पन्न येण्याऐवजी खरीप हंगामातील पेरणी, कोळपणी, खत, बी-बियाणे, शाळेत मुलांचे शिक्षण यामुळे बळीराजाच आर्थिक गणित पूर्णतः बिघडलेले असते.त्यातच तीन वर्षानंतर यावर्षी अधिक मास आला आहे. मागील अधिकच्या मास कोरोना काळात आल्यामुळे सासरे पाटलांनी जेवायला धोंड दान दिले नाही. आता सोन्याचे भाव कमी झालेले आहेत आणि कोरोना संकटही संपून गेले आहे.

आता जावयासमोर कारण तरी कुठले करावे, त्यामुळे सासरेबुवासाठी हा महिना दुष्काळात तेरावा महिना घेऊन आला आहे. जावई राजा हाताच्या बोटाकड वारंवार बघत सासरवाडीच्या फोनची वाट बघत आहे. आषाढ महिना संपताच अधिक श्रावण म्हणून सुरू होणारा अधिक मास हा यावर्षी सामान्यांसाठी खर्चिकच होणार आहे,हा अधिक मास महिन्यामुळे सासरे पाटलांच आर्थिक गणित बिघडणार आहे. कालगणनेत दर तीन वर्षांनंतर येणारा अधिक मास हा चंद्र वर्षीय व सौर वर्ष यात पडलेला तीस दिवसांचा फरक भरून काढत असतो. यावर्षी १७ जुलैपासून अधिक मासास प्रारंभ होत आहे. ग्रामीण भागात आजही अधिक मास हा धोंड्याचा महिना म्हणून ओळखला जातो. अधिक मासाचे स्वामी हे भगवान विष्णू आहेत. तर पती-पत्नीला लक्ष्मी-नारायण जोडा म्हणून ओळखले जातात. त्यामुळे धोंड्याच्या महिन्यात मुलगी व जावई यांना जेवणाचे आमंत्रण दिले जाते. त्यात त्यांना धोंडे दान केले जाते. त्यानंतर कालांतराने सोने-चांदी या मौल्यवान वस्तू जावई बापूंना देण्याची प्रथा निर्माण झाली. यंदा १८ जुलैपासून १६ ऑगस्टपर्यंत धोंड्याचा महिना असणार आहे. या महिन्यात जावईबापूंना सोन्याचा किंवा चांदीचा धोंडा दिला जातो. अधिक मासात जावयाला वाण देण्याची प्रथा आहे. याला धोंडा असेही म्हणतात. येत्या १८ जुलैपासून ज्येष्ठ मासास प्रारंभ झाला असून, जावयांसाठी हा सुगीचा महिना ठरतो. विशेषतः नवविवाहितांसाठी अधिकचा महिना म्हणजे पर्वणी म्हणावे लागेल. त्यात सुवर्णपेढ्या आणि मिठाई व्यापारी आघाडीवर आहेत. सुवर्णपेढ्यांनी जावयांना खूश करण्यासाठी आकर्षक चांदीचे दिवे, तबक आणले आहेत. सोने आणि चांदीचे दर या महिन्याभरात कमी झाल्याने सासरेबुवांकडून धोंड्याच्या महिन्यात सोन्या चांदीचे काहीतरी धोंडदान मिळणार यासाठी जावयांच्या आशा अपेक्षा पल्लवीत झाल्या आहेत.

## बहिरगाव येथे विद्यार्थ्यांसाठी स्मार्ट टीव्हीचे संच भेट

आधुनिक केसरी न्यूज

**बहिरगाव :** जिल्हा परिषदेच्या केंद्रीय प्राथमिक शाळा बहिरगाव या शाळेस आज आदर्श ग्रामपंचायत बहिरगावच्या वतीने देण्यात आलेल्या दूरदर्शन संचाचे ( स्मार्ट टीव्ही ) लोकार्पण बहिरगावचे सरपंच डॉ केशव शिरसे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ग्रामपंचायतचे उपसरपंच रवींद्र बनकर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पवार, ग्रामपंचायतचे सदस्य राहुल पवार, योगेश जाधव,पिनू पवार, शंकर दापके, शालेय समिती सदस्य सविता दापके, से नि मुख्याध्यापक विश्वनाथ राऊत, कविता निमोणे, बापूसाहेब मोरे, विजय जाधव, प्रणोती जाधव, संजय पवार, सविता जाधव त्याचप्रमाणे केंद्रीय प्राथमिक शाळा बहिरगावचे मुख्याध्यापक योगेश पाटील, सहशिक्षक शारदा भामरे, नीलिमा सोनवणे, हेमलता निकुंभ, योगेश सोनवणे आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन कौतिकराव पवार उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते सर्व ४ वर्गांसाठी दूरदर्शन संच लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी सरपंच डॉ केशव शिरसे यांनी विद्यार्थ्यांना सर्व भौतिक व आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या असून आता कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.



## कन्नड येथे जैन समाजाचा मूक मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्यात जैनांचार्य श्री 108 कामकुमारनंदीजी गुरूदेवांची हत्या करण्यात आली. त्या निषेधार्थ कन्नड शहरात तालुक्यातील सर्व जैन बांधवांनी सहभागी होत मुकमोर्चा काढण्यात आला. बाजारपेठ मधील जैन मंदिरापासून मोर्चाला सुरुवात झाली ती सिद्दीकी चौक मार्गे तहसील कार्यालयात तहसीलदार विद्याचरण कडवकर यांना व शहर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांना निवेदन देऊन सांगता करण्यात आली . या दिवशी सर्व आपापली प्रतिष्ठाने बंद ठेवून श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी दिगंबर जैन समाजाचे अध्यक्ष महावीर गंगवाल, दिलीप गंगवाल, हुकूमचंद पांडे, अजित शेठी, नयन पहाडे, जयकुमार चुडीवाल, शैलेश झांजरी, महावीर पाटणी, भरत सेठी, संतोष ठोळे, अनुज लोहाडे, परेश पहाडे, आनंद पांडे, पारस गंगवाल , मनोज चुडीवाल, जिणेश सेठी, वर्धमान ठोळे, डॉ. लोहाडे, बादल गंगवाल, कचरादास सेठी, संजोग गँगवाल , बबलू गंगवाल, राहुल पाटणी, प्रफुल्ल सेठी, दीपक पाटोदी, अशोक पांडे, डाँ प्रमोद गंगवाल, पवन चुडीवाल आदी सह वासडी, पिशोर, चापाणेर, अंधानेर, चिकलठाण, हतनूर गावचे जैन बांधव उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक अँण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# भोकर तालुक्यात खरीप पिके खरडली

## नदीनाल्यांना पूर; रस्त्याची दाणादाण

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** पावसाळ्याच्या पहिल्या चरणात वरूणराजा रूसल्याने पेरण्या खोळंबल्या. शेतकरी कावराबावरा होऊन दुबारपेरणी करावी लागते की काय अशी धास्ती घेतला होता.ऊशिरा का होईना वरूणराजाला जाग आली आणि शेतक-यावर मेहेरबान झाल्याने कष्टभरल्या चेह-यावर आनंद फुलुन आल.दोन दिवसांपासून तालुक्यात संतत धार सुरू आहे. जनजीवनविस्कळीत झालं आहे.नदिकाठालगतच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तर रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. मागीलवर्षी पावसाळा "निमंत्रण "दिल्यागत अगदि वेळेवर दत्त म्हणून हजर झाला आणि शेवटपर्यंत पाठ सोडली नसल्याने पिकाची नासाडी झाली.यंदा मात्र ऐन खरिप पेरणीच्या वेळी दडीमारून बसल्याने शेतकरी धास्तावला होता.महागडे बियाणे घेऊन पेरणी केली आणखी पाऊस लांबला तर दूबार पेरणी करावी लागते की काय या धास्तीने हैराण झाला होता.ऊशिरा का होईना वरूणराजाला "दया "आली आणि धोधो बरसुन क्षणातच जळी-स्थळी पाणीच पाणी केल. नदिनाले तुडुंब भरली, नदीकाठावर असलेल्या शेतीत पाणी शिरल्याने कोवळी रोपटे खरडून गेली. बरीच रस्ते पावसाने खचुन गेली आहेत. तालुक्यात वैरणाची गंभीर समस्या आहे. ऊन्हाळ्यात ज्या शेतकऱ्यांनी वैरण साठवून ठेवले आहे त्याना पावसाळ्यात चिंता नाही.पण सर्वसामान्य शेतकरी महागडे वैरण विकत घेऊन जनावरांची भुक भागवितात.पावसाळ्यात शेती शिवारात ऐतेच कूरण मिळत त्यामुळे वैरणाचा प्रश्न मिटतो.मागील तीन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू आहे.नदिला पुर आल्याने गावचा संपर्क तुटला आहे.जनावरांना वैरण नसल्याने त्याची उपासमार होत आहे.

**महसूल विभागाकडून पाहणी :** तालुक्यात तीन दिवसांपासून संततधार सूरू असल्याने जनजीवन विस्कळित झाले आहे .सखलभागात पाणी साचले आहे . रस्ता व शेतीचे नुकसान झाले आहे .याची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी उपविभागीय महसूल अधिकारी अनूपसिंह यादव .तहसीलदार राजेश लांडगे ,मंडळ अधिकारी शेख मुसा, तलाठी गोदरे,एम .व्हि .जोशी यांनी तालुक्यातील सुधाप्रकल्प,( नांदा खुर्द ), दिवशी ( खूर्द ), नुकसानग्रस्त शेतीची पाहणी केली आहे . ईतर तालुक्या पेक्षा भोकर तालुक्यात फारस नुकसान झाले नाही . पाऊस अधुनमधून ऊघडीप देत आहे . त्यामुळे जनजीवन सुरळीत चालू आहे .पाहणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर कीती नुकसान झाले आहे हे स्पष्ट होईल अशी माहिती तहसीलदार लांडगे यांनी दिली आहे

# शेतकऱ्यांची फसवणूक; भूमिपुत्रांचा एल्गार..!

## बोगस बियाण्याचा पर्दाफाश

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** आस्मानी संकटांचा सामना करता करता मेटाकुटीस आलेल्या शेतकऱ्यांना बोगस बियाण्याच्या माध्यमातून सुल्तानी संकटाचा सामना करावा लागत आहे. परिणामी जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागला आहे. सदर प्रकरणात फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी यासाठी भूमिपुत्र शेतकरी संघटनेने एल्गार पुकारला आहे.

भूमिपुत्रचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भूतेकर यांच्या नेतृत्वात वाशिम जिल्ह्याचे जिल्हा कृषी अधीक्षक तथा जिल्हा कृषी अधिकारी यांची भेट घेऊन सर्व तालुक्यांतील शेतकऱ्याकडून आलेल्या बोगस बियाण्यांच्या तक्रारींची तात्काळ दखल घेऊन चौकशीचे अहवाल तयार करण्यात यावेत. व बोगस बियाणे विकणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच बोगस बियाण्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

चर्चे दरम्यान, जिल्हा कृषी अधीक्षक यांनी सदर फसवणूक प्रकरणी चौकशी करुन कारवाई करण्याचे मान्य केले असून दोषींची गय केली जाणार नसल्याचे कृषि विभागाकडून सांगण्यात आले आहे. या वेळी भूमिपुत्रचे राज्य उपाध्यक्ष विश्वनाथ शेवाळे, जिल्हाध्यक्ष रामेश्वर अवचार, जिल्हाकार्याध्यक्ष उत्तमराव आरु, जिल्हा प्रवक्ते देव इंगोले, संतोष सुर्वे, सचिन काकडे, रविंद्र चोपडे, विकास झुंगरे, केशवराव गरकळ, गुणवंतराव ठाकरे, महावीर ठाकूर, विनोद घुगे, प्रवीण गोटे आदी सह, भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



# मेहगावच्या भगवानगडावर विकास कामांचे भूमिपूजन व पुस्तक प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील मेहेगाव येथील भगवानगडावर विविध विकास कामाचे भूमिपुजन व भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या सर्च फॉर ट्रुथ या इंग्रजी पुस्तकाचा मराठी भावानुवाद भगवानगड ट्रस्ट मेहगावचे अध्यक्ष सेवानिवृत्त अधिक्षक अभियंता सुधीर घुगे यांनी केला आहे. त्या पुस्तकाचा प्रकाशन साहेळा केंद्रिय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड होते. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र -कुलगुरू डॉ. श्याम शिरसाठ, माजी विभागीय आयुक्त भास्करराव मुंढे, ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सुधीर घुगे यांच्या संत भगवान बाबा कीर्तन करतांनाच्या स्वहस्ते केलेल्या पेंटिग चे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्तविक व भूमिका सुधीर घुगे यांनी मांडली. या प्रसंगी केंद्रिय मंत्री डॉ. कराड म्हणाले की, भगवानगडावर सातत्याने समाजोपयोगी व अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न होतात. येथे वारकरी शिक्षण ग्रामीण भागातील मुले घेतात त्यातून संस्कार क्षम पिढी तयार होईल. भगवानगडासह कन्नड तालुक्याच्या विकासासाठी मी कटिबद्ध असून सर्वतोपरी मदत करील असे मत त्यांनी व्यक्त केले. गडाच्या वतीने विविध क्षेत्रात महत्वाचे योगदान देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त सदस्य डॉ. गजानन सानप, कन्नडच्या शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, साहित्यिक व तिफणचे संपादक डॉ. शिवाजी हुसे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ.




केदार काळवणे, ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज जायभाये यांना समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ. श्याम शिरसाठ, डॉ. गजानन सानप, प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. केदार काळवणे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास ह.भ.प. भागवत महाराज आव्हाळे , त्रिकुटेश्वर संस्थानचे त्रिगुण भारती महाराज ,भाजपाचे संजय खंबायते, गोपीनाथ वाघ, डॉ. संजय गव्हाणे, उत्तमराव राठोड, भगवान कोल्हे, भगवान कायंदे, भगवानराव गीते, अशोक अण्णा डिघुळे, गोविदराव सोनवणे , रमेशराव नागरे , माजी सभापती अपाराव घुगे ,गणेश घुगे, पुंडलिकराव काजे, शेषराव घुगे, किसनराव घुगे ,एस.व्ही. निंभोरकर , सूर्यभान घुगे, चत्रभुज घुगे, डी.एम. घुगे, रघुनाथ घुगे, गणेश नागरे, भास्कर घुगे, गणेश बोंगाणे, रेखा बोंगाणे, पांडुरंग घुगे, हरिदास ताठे, जितेंद्र घुगे, बाबुराव घुगे, रमेश घुगे , श्याम महाले, शिंदे काका, श्री गर्जे, राजेंद्र नलावडे, प्रा. योगेश सोमवंशी, गणेश नागरे, सर्जेराव वाघ , प्रा. सुनील नागे, बंशिधर निकम, ज्ञानेश्वर ताठे, अरुण बोंगाणे, प्रकाश नागरे, रामेश्वर मोरे यांच्यासह मेहगाव, वासडी, निंभोरा, तपोवन, पळशी, रामनगर, हस्ता, खातखेडा, कन्नड, शिवराई, सिल्लोड, रोहिणी, चाळीसगाव, औरंगाबाद येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ह.भ.प. सुदाम महाराज पानेगावकर यांचे प्रवचन संपन्न झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप ढाकणे यांनी केले तर आभार रघुनाथ घुगे यांनी मानले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर